रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक १२१ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ८ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹


## नवमतदारांची नोंदणी रखडली

**रायगड :** आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंतची मतदार यादी ग्राह्य धरली जात असली तरी नवमतदारांची नोंदणी ऑक्टोबर २०२४ नंतर होऊ शकलेली नाही. त्यामुळे गेल्या वर्षभरात ज्या तरुणांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केली त्यांना येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता येणार नाही. भारतीय निवडणूक आयोगाने याबाबत सुधारित परिपत्रक न काढल्याने हा घोळ झाल्याचे समोर आले आहे. निवडणूक आयोगाने नव मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी अर्ज क्रमांक ६ करीता जन्मतारखेची १ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मर्यादा निश्चित केली आहे. म्हणजेच १ ऑक्टोबर २०२४ पर्यंत वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तीलाच ही नोंदणी करता येणार आहे. •➤पान २ वर


सी साईट रिसॉर्ट नागाव बिच येथे कामासाठी अनुभवी मॅनेजर पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक.

9422856336/9028143980


# लाल वादळापुढे प्रशासन नमले

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

खड्डेमय रस्त्यांच्या प्रश्नाबाबत शेतकरी कामगार पक्षाने मंगळवारी (दि.७) एल्गार पुकारला. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेझारी चेक पोस्ट येथे खड्ड्यांविरोधात सकाळी रस्त्यावर बसून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात हजारो कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते. अखेर शेकापच्या लाल वादळापुढे बांधकाम विभागाचे प्रशासन नमले असल्याचे चित्र पहावयास मिळाले. शेकापने केलेल्या मागण्यांची दखल घेण्यात आली. मिळालेल्या लेखी आश्वासनानंतर शेकापने आंदोलन स्थगित केले.

यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप माजी तालुका चिटणीस अनिल शांताराम पाटील, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सह चिटणीस नरेश म्हात्रे, शेकाप तालुका शेतकरी सभा अध्यक्ष अनिल गोमा पाटील, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, मुरूड तालुका शेकाप तालुका चिटणीस विजय गिदी, विलास म्हात्रे, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, सोनाली मोरे, सुधीर थळे, संजना किर, नागेश कुलकर्णी, विक्रांत वार्डे आदी वेगवेगळ्या आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित होते.

सकाळी आठ वाजल्यापासून पेझारी नाका येथे जमण्यास सुरुवात झाली. बघता बघता नाक्यावर अलोट गर्दी झाली. हातात लाल बावटा घेऊन कार्यकर्त्यांचा जमाव वाढला. महिला, पुरुष, तरुण मंडळी या आंदोलनात स्वयंस्फुर्तीने सहभागी झाले. शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. झोपलेल्या सत्ताधाऱ्यांसह भ्रष्टाचारी प्रशासनाला जागे करण्यासाठी हा लढा पुकारण्यात आला.या प्रशासनाचे करायचे काय खाली डोके वरची पाय, धिक्कार असो धिक्कार असो भ्रष्टाचारी प्रशासन व सत्ताधाऱ्यांचा धिक्कार असो अशा तीव्र निषेधाच्या घोषणा करण्यात आल्या. रस्ता रोको आंदोलनाने अलिबाग-पेण मार्गावरील रस्ता चक्का जाम झाला. भर रस्त्यात बसून कार्यकर्ते आंदोलनात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. एक वेगळा उत्साह या आंदोलनाच्या निमित्ताने दिसून आला.



(छायाचित्र : समीर मालोदे)

- **लेखी आश्वासनानंतर रास्ता रोकोला स्थगिती**
- **खड्डेमय रस्त्यांबाबत प्रशासनाविरोधात शेकापचा उद्रेक**

केलेल्या मागण्यांबाबत लेखी आश्वासनानंतरच आंदोलन स्थगित केले जाईल ही भूमिका शेतकरी कामगार पक्षाची होती. शेकाप आपल्या भूमिकेसाठी ठाम राहिला. राष्ट्रीय महामार्गासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन शेकापच्या नेत्या चित्रलेखा पाटील, ॲड. मानसी म्हात्रे यांच्यासह असंख्य जनसमुदायाची भेट घेतली. अधिकाऱ्यांनादेखील खड्ड्यात बसवून चर्चा करण्यात आली. दिवाळीपूर्वी खड्डे तातडीने दुरूस्त करून रस्ते चांगले बनविले जाणार या प्रमुख मागण्यांसह इतर •➤पान २ वर

### आमदारांकडून कोणतीच अपेक्षा नाही
#### शेकापच्या चित्रलेखा पाटील यांची टीका

- आमदार दळवी यांचा उल्लेख महेंद्र फेल्युअर दळवी असा करत त्यांचा कार्यभार निकृष्ट ठरवला. महेंद्र फेल्युअर दळवी नाव दिले तरी चालेल, असा संताप व्यक्त करीत शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांच्यावर रस्त्यांवरील खड्ड्यांच्या प्रश्नावरून कठोर शब्दात टीका केली आहे. दळवी यांच्याकडून कोणतीच अपेक्षा नाही. त्यांना खड्डे अजून खोल करायचेत. चिखलात लोळायला त्यांना भारी आवडते. यांच्या या वक्तव्यातून त्यांनी आमदारांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. शेतकरी कामगार पक्षाची नाळ सर्वसामान्यांशी जोडली गेली आहे. सर्वसामान्य जनतेला न्याय देणे शेकापचे काम आहे. मला त्या महिलेची काळजी आहे, बाईकवर नोकरीला जाणाऱ्या मुलांची काळजी आहे. या लोकांच्या अडचणींवर लक्ष केंद्रित करून शेकापने रास्ता रोको आंदोलन केला असल्याचे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

### पोलिसांचे मानले आभार

खड्ड्यांविरोधात शेतकरी कामगार पक्षाने मंगळवारी रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाच्यावेळी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पाच अधिकारी, २५ कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी, पोयनाडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक भुजबळ आदी अधिकाऱ्यांचा यावेळी समावेश होता. यावेळी पोलिसांनी चांगले सहकार्य केल्याबद्दल शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने पोलिसांचे आभार व्यक्त करण्यात आले.

### सर्वसामान्यांकडून शेकापच्या आंदोलनाचे स्वागत

अलिबाग-पेण, अलिबाग-रोहा, अलिबाग-मुरूड या मार्गावरील खड्डेमय रस्त्यांमुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाला. अपघाताचे सत्र वाढत आहे. प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. या खड्डेमय रस्त्यांविरोधात शेतकरी कामगार पक्षाने रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाचे सर्वसामान्य नागरिकांकडून स्वागत करण्यात आले. अनेकांनी शेकापच्या या आंदोलनाचे कौतुक केले. खड्ड्यांमुळे खुप त्रास होत आहे. शेतकरी कामगार पक्षाने आंदोलनाची घेतलेली भूमिका कौतुकास्पद असल्याचे बोलले जात आहे.

## वेधक

### पूरग्रस्तांसाठी कोट्यवधींचे पॅकेज

**मुंबई :** शेतकऱ्यांचे आपल्या पिकावर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम असते. अशा स्थितीत पीक करपून गेले, पाण्याखाली गेले, जमीन खरडून गेल्याने पुन्हा पेरणीची स्थितीही उरली नाही. आर्थिक आणि मानसिक त्रास शेतकऱ्यांना झाला. त्याची शंभर टक्के भरपाई कुणीच देऊ शकत नाही परंतु शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे यासाठी पॅकेज तयार केले आहे. ६८ लाख ६९ हजार हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले. २९ जिल्हे आणि २५३ तालुके सरसकट मदतीच्या पॅकेजमध्ये घेतले आहेत. जिथे पिकांचे नुकसान झाले तिथे अटी शिथिल करून मदत केली जाणार आहे. सरकारने पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटींची मदत जाहीर केली आहे. या पत्रकार परिषदेत •➤पान २ वर

### शिंदेंच्या हातून ‘धनुष्यबाण’ निसटणार?

**मुंबई :** शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह हे पुन्हा उद्धव ठाकरेंना द्यायचे की, नाही याचा निर्णय सर्वोच्च न्यायालय घेणार आहे. ते चिन्ह परत दिले तर चांगलीच गोष्ट आहे, नाहीतर हे चिन्ह गोठवले तरी चालेल. संविधानिकदृष्ट्या चिन्हाची जी चोरी झाली आहे, ती संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेली आहे. काहीजण निर्णय न झाल्याने सत्तास्थानी असतात याचा अर्थ ते बरोबरच आहे आणि संविधानिकदृष्ट्या योग्य आहेत असं नाही. निकाल उद्धव ठाकरेंविरोधात असला तरी चालेल पण निकाल लागला पाहिजे. निकाल देताना कोणत्या कारणांसह निकाल देणार हे समाजातील लोकांना कळलं पाहिजे. भारतीय संविधानाला धरून •➤पान २ वर

### ९९ लाखांची फसवणूक

**पनवेल :** तब्बल ९९ लाखांच्या फ्लॅट फसवणुकीच्या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भावेश सेंघानी, मणिलाल सेंघानी, बिरेंद्र यादव आणि मधुकर मयेकर अशी गुन्हा दाखल झालेल्या चार जणांची नावे असून, पनवेल फौजदारी न्यायालयाच्या आदेशानुसार चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोलिसांकडून करण्यात आली असल्याचे समजते. यातील तक्रारदार हबिंदर सिंग सहगल यांच्या म्हणण्यानुसार, आरोपी भावेश सेंघानी, मणिलाल सेंघानी, बिरेंद्र यादव आणि मधुकर मयेकर यांनी एकमेकांशी संगनमत करून त्यांची फसवणूक केली असल्याचे म्हटले आहे. यातील मधुकर मयेकर यांनी •➤पान २ वर

### सहाय्यक पोलीस महासंचालकांची आत्महत्या

**हरियाणा :** हरियाणाचे सहाय्यक पोलीस महासंचालक वाय. पूरन कुमार यांनी चंदीगढमधील सेक्टर ११ येथील त्यांच्या घरात डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. पूरन यांच्या आत्महत्येचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी पूरन यांचा मृतदेह शवविच्छेदन अहवालासाठी पाठवला आहे. पोलिसांनी तपास करण्यास सुरुवात केली आहे. वाय. पूरन यांची पत्नी आयएएस अधिकारी आहे. त्यांच्या पत्नी मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्याबरोबर जपान दौऱ्यावर आहेत.


# मुख्यमंत्र्यांनी लावला चुना

**। खरोशी । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यामध्ये बाळगंगा धरणाचे काम जवळ-जवळ ८० टक्के पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाला २००९ ते २०१० वर्षापासून सुरुवात करण्यात आली असून आज १६ वर्ष होत आली तरीसुध्दा हा प्रकल्प रखडला आहे. त्यामुळे संतापलेल्या ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकला होता. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीनंतर प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिल्यानंतरच ग्रामस्थांनी विधानसभा निवडणुकीत मतदान केले. मात्र मुख्यमंत्र्यांनीही प्रकल्पग्रस्तांना चुना लावला असल्याची चर्चा सध्या ग्रामस्थांमध्ये सुरु आहे.

या भागातील एकूण ६ ग्रामपंचायती हद्दीतील ९ महसुली गावे आणि १३ आदिवासी वाड्या मिळून जवळपास ३ हजार कुटुंबे विस्थापित होणार आहेत. विशेष म्हणजे, या प्रकल्पामध्ये आदिवासी बांधवांची संख्या मोठ्या प्रमाणावर •➤पान २ वर

- **१६ वर्षांपासून बाळगंगा धरणाची रखडपट्टी**
- **निवडणुकीपूर्वी दिले खोटे आश्वासन, प्रकल्पग्रस्तांचा आरोप**




> “आंतरराष्ट्रीय विमानतळाला व नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या बाळगंगा प्रकल्पाला १६ वर्षे होत आली तरी एकही प्रश्न सुटला नाही. अनेक आंदोलने केली परंतु फक्त आश्वासने देण्यात आली. गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सत्ता असूनही प्रश्न मार्गी लागत नसतील तर शासन अजून शेतकऱ्यांची किती पिळवणूक करणार? हे त्यांनी सांगावे. जवळपास ३ हजार कुटुंबे पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे पुनर्वसन आहे. आदिवासी, गोरगरिब, दिनदुबळ्या शेतकऱ्याने आपल्या शेती, घरावर तुळशीपत्र सोडले. त्यांना वाऱ्यावर सोडून असे विकासाचे प्रकल्प करून त्याचा काय उपयोग.”
>
> – अविनाश पाटील
> बाळगंगा संघर्ष समिती अध्यक्ष




हनुमान उपासक प्रख्यात ज्योतिषाचार्य...

**पंडितजी शिवाजी शास्त्री अलिबागमध्ये**

हरिद्वार, नाशिक, त्र्यंबकेश्वर येथून जनतेच्या आग्रहामुळे अलिबाग येथे आलेले आहेत.



**दुवा भी तकदीर बदल देती है । कोशिश हर बंद दरवाजा खोल देती है।**

**बुधवार दि. ८-१०-२०२५ ते गुरुवार दि. १६-१०-२०२५ पर्यंत संपर्क साधा...**

पंडितजी स्त्री पुरुषांना कोणत्याही समस्यांवर ज्योतिष शास्त्र आणि वास्तू शास्त्राच्या आधारे मार्गदर्शन व निवारण करतात. आपला चेहरा, हस्त रेखा, जन्म कुंडली, जन्म तारीख किंवा फोटो निरीक्षण करुन भविष्य सांगतात. आपली नोकरी, व्यापार, उद्योगधंदा, कोर्ट, कचेरी, कुटूंबातील कलह, संतान सुख, नोकरी, प्रेम विवाह, शारीरीक दोष निवारण, कालसर्प दोष, ग्रहांची बाधा निवारण किंवा आपली उन्नती कोणत्याही दोषामुळे होत नाही. यावर उपाय सांगतात. नारायण नागबळी विषयी मार्गदर्शन, शनी, मंगळ गुरु या ग्रहांची पीडा, रुद्र अभिषेक, नवचंडी पाठ, मृत्युंजय जप, सप्तपदी पाठ, शनि अभिषेक, राजनिती अशा अनेक कठीण समस्येवर उपाय करुन मानसिक व शारिरीक कष्ट दूर करतात. स्त्री पुरुष दो, स्थावर मालमत्ता, प्रॉपर्टी संदर्भात योग्य मार्गदर्शन, अभ्यासात मन न लागणे, शत्रु परेशानी, मुलामुलीचे विवाह होत नाहीत. संबंध तुटतात, कुलदेवताचा दोष, मकान, आदी यावर उपाय सांगतात. कोणतेही प्रश्न शास्त्राच्या आधारावर सांगतात.

**सूचना-** शनि रक्षा कवच, नजर सुरक्षा कवच, नवग्रह राशीचे खडे, प्राणप्रतिष्ठा सर्व प्रकारची विधी हनुमान दादाच्या कृपेने सिद्धी करुन मिळेल. संतान सुखासाठी पती पत्नी दोघांनी भेटावे. व्यसनमुक्तीवर मार्गदर्शन मिळेल. सर्व पुजा पाठ शास्त्रीय पद्धतीने केल्या जातील. ज्यांची जन्म कुंडली असेल त्यांची अवश्य घेऊन येणे.

**पत्ता-** हॉटेल गुरुजी, रुम नं. १०४, अलिबाग बिच, ता. अलिबाग, जि. रायगड

आपले प्रश्न आपल्यापर्यंत असतील, पंडितजी केवळ ३ प्रश्नांचेच उत्तर देतील.

भेटण्या अगोदर आपली वेळ फोनवर निश्चित करा.

**Contact : 8263951355**

**भेटण्याची वेळ** सकाळी ९.०० ते सायं. ६.००

भविष्य पाहण्याची फी रु. १०१ /- मात्र



## तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

**बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.**

### तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा

### तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल **(https://udgam.rbi.org.in)** पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.




अधिक माहितीसाठी भेट द्या: **https://rbikehtahai.rbi.org.in**

अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: **rbikehtahai@rbi.org.in**

क्यूआर कोड स्कॅन करा

**अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप नंबर 99990 41935**

जनहितार्थ जारी

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

# दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या

- तीन गजाआड, दोन फरार
- खालापूर पोलिसांची कारवाई

| रसायनी | प्रतिनिधी |

मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरील खालापूर टोलनाक्याजवळ वाहन चालकांवर दरोडा टाकणाऱ्या टोळीचा खालापूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या गुन्ह्यातील तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, दोन आरोपी फरार आहेत. अटक आरोपींकडून १५ हजार रुपये हस्तगत करण्यात आले आहेत.

२९ सप्टेंबरच्या पहाटे साडेचारच्या सुमारास फिर्यादी दिनेश बुधाराम गोदारा आणि त्याचा मित्र सुरेंद्र जांगु हे मुंबईकडे जात असताना खालापूर टोलनाक्याजवळील शौचालयाजवळ थांबले. त्याच वेळी झाडीत दबा धरून बसलेल्या पाच चोरट्यांनी त्यांना जबरदस्तीने ओढत नेऊन मारहाण केली. कोयत्याचा धाक दाखवून त्यांनी दोघांकडून एकूण ३६,५०० रुपये रोख आणि ओळखपत्रे जबरदस्तीने हिसकावून घेतली आणि अंधारात पसार झाले. सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक अशोक जगताप यांनी रात्री गस्तीदरम्यान घटनास्थळी धाव घेतली. डेल्टा फोर्सचे प्रविण सावंत आणि राजेश शिंदे यांच्या मदतीने हायवेलगत झाडीत संशयास्पद हालचाली दिसताच पोलिसांनी पायपीट करीत सापळा रचला. थोड्याच वेळात चोरट्यांचा गट शेतातून पळताना दिसला. तेव्हा पोलिसांनी अत्यंत शिताफीने पाठलाग करून अनिल पवार याला पकडले आणि त्याने चौकशीत त्याच्या साथीदारांची देखील नावे उघड केली. अनिल पवारच्या या कबुलीनंतर किशोर पवार आणि गुरुनाथ पवार या दोघांनाही पोलिसांनी अटक केली. सर्व आरोपी हे खालापूर तालुक्यातीलच असल्याचे निष्पन्न झाले आहे. उर्वरित दोघे आरोपी फरार असून त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. अटक आरोपींना न्यायालयाने ८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी दिली असून, त्यांच्या चौकशीत आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी तपासादरम्यान आरोपींकडून लुटलेल्या पैशांपैकी १५,००० रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपींचा पूर्वीचा गुन्हेगारी इतिहासही उघड झाला असून, त्यांनी यापूर्वी अनेक चोरी, दरोड्याचे गुन्हे केल्याचे नोंदीत आढळले आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल आणि पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी कार्यवाही पथकात पो. उप.नि. अशोक जगताप, पोशि अर्जुन मोरे, शिवाजी लोरे, चालक संदेश कावजी, होमगार्ड गायकवाड यांचा समावेश होता.




# एसटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक- प्रताप सरनाईक

| मुंबई | प्रतिनिधी |

एस टी महामंडळ कामगारांच्या विविध मागण्या आहेत.त्या रास्त असून या मागण्या पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी कामगार संघटना सोबत मंत्रालयात आयोजित बैठकीत सांगितले.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, कामगारांचे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व अन्य थकीत भत्ते, तसेच दिवाळी सण अग्रिम देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल. सन २०१८ पासून कर्मचाऱ्यांची उपरोक्त स्वरुपाची आर्थिक देणी प्रलंबित आहेत. त्यासाठी सुमारे ४४०० कोटी रुपये लागणार आहेत. मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रत्येक वेळेस शासनाकडे निधी मागणी योग्य नाही, त्याकरता एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. म्हणून मी कार्यभार स्वीकारल्या पासून एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून वर्षाला सुमारे १०० कोटी रुपये, आधुनिक पार्सल सेवेच्या माध्यमातून वर्षाला १०० कोटी तसेच, महामंडळाच्या बस आगारांत असलेले पेट्रोल पंप सध्या केवळ महामंडळाच्या बसेस करीता इंधन पुरवठा करतात. भविष्यात हे पेट्रोल पंप व्यावसायिक स्वरूपात सुरू करण्यात येत आहे. याद्वारे वर्षाला २०० ते २५० कोटी रुपये मिळतील. अशा प्रकारे वर्षाला ५००-६०० कोटी रुपयांची उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. या बरोबरच उत्पन्नाचा नवा स्त्रोत म्हणून एसटी महामंडळाचे स्वतःचे प्रवासी ॲप विकसित करण्यात येत आहे, या मधूनही ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाईक सेवा पुरविणात येणार आहे. पीपीपी तत्त्वावर एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार आहे.

यामध्ये कामगारांना सदनिका व विश्रामगृह बांधण्याचे देखील प्रायोजन आहे. त्यातून कर्मचाऱ्यांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सार्वजनिक-खाजगी भागिदारीतुन होणाऱ्या प्रकल्प विकासातून महामंडळाची स्थावर मालमत्ता विकसित होईलच त्याचबरोबर वर्षाला एक ते दीड हजार कोटी रुपये उत्पन्न देखील मिळणे अपेक्षित आहे.

## वरसोली मंदिर प्राणप्रतिष्ठा वर्धापन

**अलिबाग :** वरसोली येथील श्री विठोबा रखुमाई मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचा १७ या वर्धापन दिन मंगळवारी (दि. ७ ऑक्टोबर) विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. त्या निमित्त काकड आरती, महाअभिषेक, श्री लक्ष्मीयाग आयोजित करण्यात आला होता. रामेश्वर टिल्लू यांच्या हस्ते हे धार्मिक विधी करण्यात आले. या याचे पौरोहित्य वेदमूर्ती ब्रह्मेश धर्माधिकारी यांनी केले.यावेळी त्यांनी लक्ष्मीयागाचे महत्व अधोरेखित केले. कुंकुमार्चन सोहळाही उत्साहात पार पडला. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी सुप्रसिद्ध भजनकार शंकुनाथ भोईर यांचे सुश्राव्य भजन उत्साहात पार पडले. पखवाज वादन किशोर पाटील यांनी केले, महावीर आगरी ग्रामस्थ मंडळ खंडाळे यांचे भजन आयोजित करण्यात आले.

# ताम्हिणी घाटात मृत्यूची वळणे

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या आणि पर्यटकांना भुरळ घालणाऱ्या ताम्हिणी घाटात तीव्र उतार आणि चढाईचा अवघड वळणांचा मोठा घाटरस्ता आहे. या घाटात पुरेसे संरक्षण कठडे आणि संरक्षक भिंतींचे कवच नसल्याने धोकादायक वळणांवर वारंवार अनेक वेळा जीवघेणे अपघात होत आहेत.

माणगाव ते विळे औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक कारखान्यांच्या २० कि. मी. परीसरापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण न झाल्याने अपघातांत दुपटीने वाढ झालेली आहे. येथील औद्योगिक प्रकल्पांमधून मोठमोठी अवजड वाहनांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे पर्यटकांना आणि प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. याबाबत रस्ते विकास महामंडळ अनभिज्ञ असून काहीच कारवाई करताना दिसत नाही.



माणगाव ते विळे आणि विळे ते पुणे या महामार्गावर दिवसेंदिवस रहदारी वाढत आहे. त्यामुळे दररोज अपघात होऊन अनेक नाहक बळी जात आहेत. दिघी बंदर ते पुणे या महामार्गावरील दिघी ते माणगाव आणि विळे ते पुणे हा महामार्ग पूर्ण झाला आहे. मात्र माणगाव ते विळे हा महामार्ग रुंदीकरण न झाल्याने त्यांचे दुपदरीकरण अद्याप झालेले नाही. हा भाग दुर्गम आणि डोंगराळ आहे. या महामार्गावर देखील अवघड वळणे आहेत. तसेच या महामार्गाचे रुंदीकरण न झाल्याने नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. याचा फटका प्रवाशांना आणि वाहतूक कोंडीला बसतो. येथील औद्योगिक प्रकल्पांमधून मोठमोठे कंटेनर व अवजड वाहने सातत्याने दिघी बंदरात येजा करीत असतात. त्यामुळे येथील धोकादायक वळणांवर अपघात होत असतात. या घाटात सुट्टीच्या दिवशी तरुणाई पूणे आणि मुंबई या शहरातून अवतरलेली असते. त्यांचा रस्त्यावरच राजरोसपणे धांगडधिंगा सुरू असतो. त्यातील बहुतांश मद्यधुंद अवस्थेत असतात. या बेधुंदपणे नाचणाऱ्या तरुणांना आवरण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येत नसल्याने नेहमीच हाणामारी होत असतात.

## एका इसमास केले अटक

पनवेल : नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतून दोन वर्षासाठी हद्दपार केलेल्या आरोपीला, तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन करून हद्दीत प्रवेश केल्याप्रकरणी खारघर पोलिसांनी अटक केली आहे.

अक्षय मोहिते असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पनवेल पोलिस उपायुक्तांच्या आदेशानुसार अक्षय मोहिते याला नवी मुंबई पोलिस आयुक्तालय हद्दीतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले होते. मात्र सदरचा हा तडीपार गुन्हेगार अक्षय मोहिते हा खारघर से २ रेल्वे स्थानकाजवळ आला असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्या मार्फत मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सदरठिकाणी सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. आरोपीने पोलिस उपायुक्तांच्या हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




# वन्यजीव सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा-शरदवाडी येथे वन्यजीव सप्ताह निमित्त परिमंडळ पोटलजच्या वनाधिकारी यांच्यावतीने शाळेतील विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले.

१ ते ७ ऑक्टोबर हा वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो.वन्यजीव सप्ताहा निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वन्यजीवाची शिकार करू नये,वन्यजीवाची जोपासना केली पाहिजे त्यामुळे सजीव सृष्टीमध्ये समतोल राखण्यासाठी मदत होते. वन्यजीवांची शिकार केल्यास तुरुंगवास व दंडात्मक कारवाई कायदयानुसार केली जाते. या कार्यक्रमासाठी वनपाल उत्तम किसनराव शिंदे,वनरक्षक व्यंकट बालाजी पवार, समाधान कोंडीबा कुरे, सायली दिल्लीय महाडीक साधुराम खेनू वारगुडे. हंगामी वनमजूर मोनू मोचे, शाळाप्रमुख विशाल ढोले व उपशिक्षक नरेश शिंदे ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

## नवरात्र उत्सवात भजन सेवा

पनवेल : पनवेल शहरातील हिंदू सार्वजनिक महोत्सव मंडळ येथे जय माताजी महिला भजन मंडळा तर्फे भावपूर्ण भजन गायन सादर करण्यात आले तसेच संगीताच्या तालावर महिला भगिनींनी गरबा नृत्य करून देवीला साद घातली. भक्तीभावाने वातावरण भारले गेले आणि उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जय माताजी महिला भजन मंडळ गेली दहा वर्षांपासून सातत्याने भजन सेवा देत असून, भजनाच्या माध्यमातून सामाजिक कार्यातही मोलाचे योगदान देत आहे. या मंडळाने सार्वजनिक गोशाळांमध्ये गायींसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यासाठी देणगीच्या माध्यमातून मोठे योगदान दिले आहे, तसेच इतर सामाजिक उपक्रमांमध्येही सहभाग घेतला आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात आध्यात्मिकतेसोबतच सेवा भावनाही दृढ होत आहे.

पान १ वरून

## लाल वादळापुढे प्रशासन नमले

मागण्यांचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेतले जाईल असा इशारा देण्यात आला. अखेर लाल वादळासमोर प्रशासनाला झुकावे लागले. रस्त्यांची तातडीने डागडूजी केली जाईल, असे लेखी आश्वासन दिल्यावर रास्ता रोको आंदोलनाला स्थगिती देण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

**पथनाट्य, भजनातून खड्डेमय रस्त्यांचा पोलखोल**

सकाळी साडेनऊ वाजल्यापासून प्रत्यक्षात आंदोलनाला सुरुवात झाली. असंख्य महिला व पुरुष कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले. पेझारी येथील चेक पोस्ट परिसर कार्यकर्त्यांनी फुलून गेला होता. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, ॲड. मानसी म्हात्रे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते हातात लाल बावटा घेऊन रस्त्यावर बसले. शेकाप तालुका महिला आघाडीच्या वतीने पथनाट्याचे सादरीकरण करण्यात या पथनाट्यातून खड्ड्यांमुळे होणारा त्रास, अधिकाऱ्यांचा असलेला वेळकाढूपणा, भ्रष्ट सत्ताधारी व अधिकारी यांचा कारभार उघड केला.तसेच नागरिकांना होणाऱ्या त्रासाची जाणीवदेखील या नाट्यातून करून देण्यात आली. तसेच हातात टाळ घेऊन शेकाप स्टाईलने भजन किर्तनाच्या रुपात खड्डेमय रस्त्यांचा पोलखोल करण्यात आली.

**असे असणार रस्त्याचे काम**

अलिबाग पेण मार्गावरील २२.१४ किलो मीटर रस्त्याच्या कामाची प्रशासकीय खर्चासह किंमत ४९ कोटी ६५ लाख इतकी आहे. निव्वळ स्थापत्य कामाची किंमत निविदेसाठी ) ३९ कोटी ४० लाख रुपये आहे. ठेकेदाराने निविदेची भरलेली रक्कम २२.१४ कोटी रुपये आहे. देवकर अर्थमुव्हर्स या कंपनीला ठेका देण्यात आला आहे. या कंपनीमार्फत डांबरीकरणाचे काम केले जाणार आहे. कामाचा कालावधीत नऊ महिन्याचा आहे. दोन्ही बाजूला मुरमाची साईड पट्टी, संरक्षक भिंत असणार आहे. खड्डे भरण्याचे काम दिवाळीपूर्वी पूर्ण करण्यात येईल. बुधवारपासून खड्डे बुजविण्याचे काम व डागडूजी सुरू केली जाईल. लवकरच मुळ रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल, अशी लेखी माहिती राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अभियंता यांनी दिले.

## मुख्यमंत्र्यांनी लावला चुना

आहे. या भागात आजपर्यंत कोणत्याच गावाचे पुनर्वसन झालेले नाही. जमिनीचा मोबदला, पुनर्वसनासाठी प्लॉटचे वाटप, घरांच्या किंमती, पुनर्वसन आराखडा हे सर्व प्रश्न आजही प्रलंबित आहेत. कारण प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणताही अधिकारी आपली भूमिका स्पष्ट करत नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांची नाराजी दिसून येत आहे.

आजपर्यंत १६ वर्षांच्या कालावधीत तीन निवडणूका झाल्या. मात्र एकाही लोकप्रतिनिधीकडून हा प्रश्न सुटला नाही. त्यामुळे यापुढे शेतकऱ्यांनी प्रकल्पासाठी जागा द्यायची की नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. गतवर्षी संतप्त प्रकल्पग्रस्तांनी लोकसभेला बहिष्कार टाकला होता. तसेच विधानसभा निवडणुकीतही बहिष्कार कायम ठेवणार होते. परंतु तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचार सभेत बाळगंगा प्रकल्प प्रलंबित प्रश्न विधानसभा निवडणुक झाल्यानंतर लगेचच सोडवू, असे आश्वासन त्यावेळी दिले होते. त्याचे काय झाले? ते हवेत विरले की काय?असा सवाल शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.नवीन मुंबई येथील आतंरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प पूर्ण होत असून त्याच प्रकल्पाला पाणी पुरवठा केला जाणाऱ्या बाळगंगा प्रकल्पाचे आजही प्रश्न प्रलंबित आहेत. या प्रकल्पाचे प्रश्न कधी सुटणार असा सवाल प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून केला जात आहे.प्रकल्प किंवा पुनर्वसन तसेच इतर सर्व गोष्टींना वेळ होत आहे. प्रकल्पग्रस्तांसमोर नवनवीन आव्हाने समोर येत आहेत. घर बांधण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. मिळणाऱ्या घरांचा मोबदल्याविषयी प्रकल्पग्रस्त धास्तावला आहे. आश्चर्यकारक बाब म्हणजे अजूनही येथील प्रकल्पग्रस्तांना माहीत नाही आपले पुनर्वसन कुठे होणार? कुटुंबातील व्यक्तीला प्लॉट कुणाला मिळणार, तसेच किती मिळणार, कसा मिळणार आणि कुठे मिळणार? याच विचाराने प्रकल्पग्रस्त आजही संभ्रमात आहेत. विशेष म्हणजे या धरणाला ग्रामस्थांनी विरोध केला नाही. आधी पुनर्वसन मग धरण या कायद्याप्रमाणे शासनाने काहीही न करता या धरणाचे ८० टक्के काम पूर्ण केले आहे. मात्र, या धरणग्रस्तांचे पुनर्वसनाचे काम शून्य टक्केच आहे. त्यामुळे शासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने प्रकल्पग्रस्तांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्याय मिळालेला नाही. बाळगंगा धरण प्रकल्पाचे पाणी नवी मुंबईतील जनतेला पाण्याची गरज पुरविण्यासाठी सिडको मार्फत राबविणेत येत आहे. तशा प्रकारचा करारही सिडको व शासन यांच्यामध्ये झाला आहे. शासनाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व सोयीसुविधा पूर्ण करण्याची जबाबदारी विविध विभागांना दिली होती. परंतू हे विभाग बाळगंगा प्रकल्पाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रकल्पावेळी जाहीर झालेल्या निवाड्यात घरे, मंदिर, झाडे, फळझाडे, पॅकेज, आकारफोड न झालेले क्षेत्र याची फेरतपासणी, फेरमुल्यांकन व फेर निवाड्याद्वारे सरसकट सर्वांना सारखाच दर देण्याबाबतची धरणग्रस्तांची मागणी होती. ती मिळावी अशी मागणी प्रकल्पग्रस्तांकडून केली जात आहे.

**सरकारची उदासीनता**

शासनाच्या हलगर्जीपणामुळे तसेच प्रकल्पग्रस्तांचे बेकायदेशीर निवाडे प्रसिध्द केल्यामुळे त्यामध्ये अनेक गंभीर चुका निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे हा निवाडा चुकीचा आहे. म्हणून प्रकल्पग्रस्तांना न्याय निवाड्यासाठी कोर्टाचा आधार घ्यावा लागला. मग शासन या प्रकल्पग्रस्तांच्या गंभीर समस्येवर विचार करणार आहे कि नाही? नसेल तर त्यांच्या नावे ७/१२ करण्यात यावा. याबाबत शासनाने कालमर्यादेत ठोस पाऊल उचलणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा प्रकल्पग्रस्त पुन्हा शासनाच्याविरोधात आंदोलन करतील, असा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे.

## नवमतदारांची नोंदणी रखडली

ही मर्यादा महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठरवण्यात आली होती. मात्र विधानसभेची निवडणूक पार पडल्यानंतर ही मर्यादा अद्ययावत केलेली नाही. त्यामुळे १ ऑक्टोबर २०२४ नंतर ज्या युवकांनी आपल्या वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत त्यांच्या नावांची नोंदणीच होत नसल्याचे आढळून आले आहे. गेल्या वर्षभरात वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवकांना येत्या महापालिका निवडणुकीसाठी मतदान करता येणार नाही.

दरम्यान, मतदार यादी तयार करताना चार पात्रता दिनांक ग्राह्य धरावे. त्यात १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर या तारखांची मर्यादा देण्यात आली आहे. यानुसार दर तिमाहीत एक सारांश पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. परंतु २०२४ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुका पूर्ण झाल्याने पुढील निवडणुका लागेपर्यंत त्याची आवश्यकता नसल्यामुळे हे परिपत्रक अद्ययावत करण्यात आले नसल्याचे आढळून आले आहे, असे भारत निवडणूक आयोगाने १२ जुलै २०२२ रोजी सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

## पूरग्रस्तांसाठी कोट्यवधींचे पॅकेज

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, घरांची पडझड झाली, तिथे घरे उभारली जातील, ५० हजार रूपयांची मदत दुकानदारांना करणार आहेत. दुधाळ जनावरांसाठी ३७ हजार ५०० रूपये मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. ३ जनावरांची अट रद्द केली आहे. जेवढी जनावरे दगावली तेवढी मदत दिली जाईल. खरडून गेलेली जी जमीन आहे तिथे ४७ हजार हेक्टरी रोख आणि ३ लाख रूपये हेक्टरी नरेगाच्या माध्यमातून देणार आहोत. ज्या विहिरींमध्ये गाळ गेलाय, नुकसान झाले आहे तिथे विशेष बाब म्हणून ३० हजार रूपये प्रति विहीर भरपाई दिले जाणार आहे. पायाभूत सुविधांचे जिथे नुकसान झाले तिथे १० हजार कोटी मदत केली जाणार आहे असं त्यांनी सांगितले.६१७५ कोटी रूपये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देणार आहोत. बियाणे आणि इतर कामांसाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जाईल. कोरडवाहू शेतकऱ्यांना १८ हजार ५०० रुपये हेक्टरी, हंगामी बागायतदार शेतकऱ्यांना २७ हजार प्रति हेक्टरी, बागायती शेतकऱ्यांना ३२ हजार ५०० हेक्टर मदत दिली जाईल. ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे त्यांना १७ हजार प्रति हेक्टर मदत विम्यातून केली जाणार आहे. राज्य सरकारच्या वतीने ३१ हजार ६२८ कोटी रूपयांचे मदतीचे पॅकेज सरकारकडून दिले आहे. जास्तीत जास्त भरपाईचा पैसा दिवाळीच्या आधी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. दरम्यान, आम्ही तिघांनी बसून या पॅकेजवर चर्चा केली. शेतकऱ्यांवर अभूत पूर्व संकट असल्याने इतर ठिकाणचे चार पैसे कमी केली तरी शेतकऱ्यांना पैसे द्यायचे आहेत. कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मुलाचे शिक्षण बाधित होऊ नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्यासाठी सीएसआर फंड काही जण द्यायला तयार आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पैसे दिले जातील. अजूनही काही मदतीची गरज असेल तिथे मदत करण्याची तयारी शासनाची आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## शिंदेंच्या हातून ‘धनुष्यबाण’ निसटणार?

निकाल असला तर तो उद्धव ठाकरे यांच्या बाजूने असेल अशी शक्यता आहे, असा दावा वकील असीम सरोदे यांनी केला आहे. माध्यमांशी बोलताना असीम सरोदे म्हणाले की, धनुष्यबाण पक्षचिन्ह मूळ शिवसेनेचे आहे. ते चोरण्यात आले आहे. ही चोरी महाराष्ट्राने पाहिली आहे. अंतिम सुनावणी घेतली तरी दोन्ही बाजूची तयारी आहे. पक्ष चिन्हाचे वाटप करताना कायद्याचे उल्लंघन झालंय का, शिवसेना कुणाची हे ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे, परंतु ते निवडणूक आयोगाला अधिकार आहेत का? हे २ प्रश्न महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे अंतिम सुनावणी आज होऊ शकते. आजच निकाल येईल असं होणार नाही. कदाचित काही दिवस राखीव ठेवले जातील. आज १६ नंबरला हा खटला आहे. दुपारी १२ वाजता सुनावणी झाली तर १-२ तास सुनावणी होईल असं त्यांनी सांगितले. निवडणूक आयोगाने शिवसेनेचे पक्षचिन्ह दिले ती प्रक्रिया चुकीची आणि बेकायदेशीर आहे. निवडणूक आयोगाने पक्षचिन्हाबाबत निर्णय घेणे अपेक्षित होते, परंतु त्यांनी शिवसेना एकनाथ शिंदेंची आहे, असाही निकाल देऊन टाकला होता. हे निवडणूक आयोगाच्या अख्यारित्य नाही, त्यांचा तो अधिकार नसताना त्यांनी निर्णय घेतला. ही सुनावणी दोन मुद्द्यांवर होईल. दोन्ही बाजूकडून लेखी युक्तीवाद मांडण्यात आला आहे. उद्या मौखिक युक्तीवाद ऐकल्यानंतर त्यावर निकालही येऊ शकतो असंही वकील असीम सरोदे यांनी म्हटलं. दरम्यान, न्या. सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोरच शिवसेना चिन्ह आणि नावाचा खटला सुरू आहे. १९ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या काळात राष्ट्रपती आणि राज्यपाल वादावर घटनापीठाची सुनावणी होणार होती त्यामुळे हा खटला लांबणीवर पडला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील काही महिन्यात पार पडतील. त्याआधीच खरी शिवसेना कुणाची हा निकाल सर्वोच्च न्यायालय देणार आहे. त्यामुळे धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे यांच्याकडे कायम राहणार की ते पुन्हा उद्धव ठाकरे यांना मिळणार हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

## ९९ लाखांची फसवणूक

खारघर सेक्टर १०, प्लॉट नंबर २०४, एशियन गॅलेक्सी येथील फ्लॅट क्रमांक ए-७०४ चे कुलूप तोडून जबरदस्तीने ताबा घेतला व यानंतर मयेकर याने फ्लॅट रिकामा करण्यास नकार दिल्यावर, बिल्डरने तक्रारदाराला त्याच प्रकल्पात आणखी दोन फ्लॅट (३-६० आणि ३-६०२) देण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनाचा वापर करून, आरोपीने तक्रारदाराकडून फ्लॅटसाठी एकूण ९९ लाख १२ हजार ०३० रूपये इतकी रक्कम वसूल केली. मात्र ती रक्कम मिळाल्यानंतरही, त्यांना आजतागायत दोन्ही फ्लॅटचा ताबा देण्यात आलेला नाही. त्यामुळे हरबिंदर सिंग सेंहगल यांनी न्यायालयात धाव घेवून न्यायालयाचे दरवाजे ठोठावले असता, अखेरीस न्यायालयाच्या आदेशानंतर खारघर पोलिसांनी उपरोक्त चार जणांविरोधात फसवणूक आणि बेकायदेशीर मालमत्तेचा ताबा घेतल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

**जाहीर नोटीस**

अर्जदारतर्फे ॲड.एस.ए. राऊत

अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १४३/२०२५

श्रीमती पुष्पा लक्ष्मण जांगळे वगैरे २९ — अर्जदार

वि

कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

१) अर्जदार यांनी मोतीराम गोरोबा बंद्री व लक्ष्मीबाई मोतीराम बंद्री हे अनुक्रमे १२/०२/१९८३ व १५/०२/१९८३ मयत झाल्याचे असल्याने यांचे हयात मुली व मयत मुले व मुलींचे वारसाची वारसनोंद मौजे अलिबाग सिटी सर्व्हे नं. २३८/१ क्षेत्र ६.७० चौ. मीटर, मौजे अलिबाग सिटी सर्व्हे नं. २३८, क्षेत्र १७४.७० चौ. मीटर या मिळकतीला होण्यासाठी वारसदाखला मिळण्यासाठी दिवाणी न्यायालयात चौ.अ. दाखल केलेला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा नेमल्या तारखेस मे. न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. सदर अर्जाची नेमली तारीख दि. १०/११/२०२५ आहे. याकामी मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार नं.१ ते ३ यांच्या नावे वारस प्रमाणपत्र अदा केले जाईल हे तुम्हास कळावे.

आज दिनांक २९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी. अलिबाग-रायगड | कोर्टाचा शिक्का | सही/- कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी. अलिबाग-रायगड

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता. पेण, जि. रायगड**

दूरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६ Email id-tahasilpen@gmail.com

महसूल शाखा क्र. फौजदारी/कात-४/जन्मदाखला/दा.क्र.२९९/२०२५

**जाहिरनामा**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

केशव महादू म्हात्रे — अर्जदार
रा. बोरी, पो. वडखळ, ता. पेण, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत बोरी, — सामनेवाला
ता. पेण, जि. रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १९/०३/१९७२ रोजी मौजे बेणघाट, ता. पेण, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत बोरी, ता. पेण, जि. रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसात कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयात समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयात मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण

सिडको शहरांचे शिल्पकार | सत्यमेव जयते भारत सरकार | महाराष्ट्र शासन | Navi Mumbai International Airport

# नवे पर्व देशाच्या विकासाचे, महत्वाकांक्षांच्या परिपूर्तीचे

## उद्‌घाटन

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

### महा-मुंबईसाठी अंदाजे ₹ १९,६५० कोटी खर्चाचे नवीन ग्रीनफील्ड विमानतळ





शुभहस्ते


## नरेंद्र मोदी

प्रधानमंत्री



• दिनांक: बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५ • दुपारी: ३:०० वा.
• स्थळ: नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प स्थळ, नवी मुंबई, महाराष्ट्र

- विकासाला गती: विमानतळ प्रकल्पामुळे उत्पन्न, रोजगार, रिअल इस्टेट आणि व्यवसाय संधींना नवीन गती मिळेल.
- बहुविध वाहतूक केंद्र: भारताचे पहिले परिपूर्ण मल्टिमोडल विमानतळ, ज्यामुळे लॉजिस्टिक्स, ई-कॉमर्स, आदरातिथ्य आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल.
- प्रती वर्ष प्रवासी वाहतूक क्षमता - २० दशलक्ष (टप्पा-१) व ९० दशलक्ष (अंतिम टप्पा)
- प्रती वर्ष मालवाहतूक क्षमता - ०.८ दशलक्ष मेट्रिक टन (टप्पा-१) व ३.२५ दशलक्ष मेट्रिक टन (अंतिम टप्पा)
- महाराष्ट्रासह देशातील स्थानिक व प्रादेशिक सांस्कृतिक वारशाचा प्रभावी अनुभव प्रदान करण्याकरिता डिजिटल व भौतिक कला प्रदर्शन
- पारंपरिक भारतीय वास्तुकला आणि अत्याधुनिक स्थापत्याचा डौल व कार्यक्षमता यांचे अनोखे मिश्रण असणारी 'कमळ' प्रेरित प्रवासी टर्मिनल इमारतीची रचना
- दोन स्वतंत्र धावपट्ट्यांसह प्रत्येक धावपट्टीकरिता दोन समांतर टॅक्सी वे
- एकूण क्षेत्रफळ - ११६० हेक्टर
- द्रुतगती महामार्ग, मेट्रो, उपनगरीय रेल्वे, वॉटर टॅक्सी, इत्यादींद्वारे कनेक्टिव्हिटी लाभलेले देशातील पहिले बहुउद्देशीय विमानतळ
- भविष्यातील तंत्रज्ञानाचे एकात्मीकरण करून किरकोळ खरेदी, अन्न व पेय, ड्युटी फ्री खरेदी, सुलभ बॅग हाताळणी आणि लाउन्ज चेक-इन इत्यादीकरिता डिजिटल सेवांची सुलभ उपलब्धता



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ
महा-मुंबईची उज्ज्वल भविष्याकडे नवी झेप

DD NEWS डी. डी. न्यूज वर थेट प्रक्षेपण

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

# बूट-फेक आणि दातखीळ

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर भर न्यायालयात झालेला बूटफेकीचा प्रयत्न म्हणजे हिंदूराष्ट्राचा चेहरा किती भयानक असेल याचे आणखी एक उदाहरण आहे. राकेश किशोर नावाच्या एका वकिलाने हा बूट फेकला व सनातन धर्माचा अपमान हिंदुस्थान सहन करणार नाही अशा घोषणा त्याने दिल्या. राकेश हा कोणी नवथर तरुण नाही. चक्क ७१ वर्षांचा इसम आहे. याचाच अर्थ हा कोण्या गटाने ठरवून केलेला कट आहे. पूर्वी मराठीत सनातनी हा शब्द मागास या अर्थाने वापरला जात असे. ज्ञानेश्वर किंवा तुकारामांना त्रास देणारे सनातनी होते असे लहानपणी सर्वांनी पाठ्यपुस्तकात वाचलेले असेल. पण हिंदी गायपट्ट्यात सनातनी याचा अर्थ हिंदू वैदिक धर्म असा होतो. त्यामुळे सनातनी संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती असे मानले जाते. अलिकडे नरेंद्र मोदी व सरसंघचालक मोहन भागवत हेदेखील वारंवार सनातन धर्माचा उल्लेख करीत असतात. आता हा जो स्वतःला सनातनी म्हणवणारा राकेश आहे त्याच्या कृतीबाबत मोदी व भागवत यांनी जबाब द्यायला हवा. संघवाले तर सतत चारित्र्य, संस्कार यांच्याविषयी बोलत असतात. या तथाकथित सनातन धर्माचे संस्कार सरन्यायाधीशांना बूट फेकून मारण्यास शिकवतात काय हे या लोकांनी सांगायला हवे. गवई यांनी तर पोलिसांकडे तक्रारही केली नाही. त्यामुळे राकेश याची चौकशी करून त्याला सोडून देण्यात आले. एरवी पोलिस चौकशी करीत असते तर कायद्यानुसार त्याला शिक्षा होईल असे सांगण्याची पळवाट भागवत व मोदींना मिळाली असती. पण आता तो सुटलेला असल्याने सनातन धर्मानुसार त्याला कोणती शिक्षा दिली जाणार हे या दोघांनी सांगायला हवे. असला इसम खरा हिंदू असू शकत नाही इतके तरी किमान यांनी म्हणायला हवे. आपल्याहून टोकाचे भिन्न विचार मांडणाऱ्यांनाही सन्मानाने वागवण्याची प्राचीन भारतीय परंपरा आहे. इथे तर भारताच्या न्याययंत्रणेचे प्रमुख असलेल्यांचा अपमान करण्याचा व त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला आहे. शिवाय त्याला सनातन धर्माच्या नावाखाली शूर कृत्य असल्याचा मुलामा देण्याचा घृणास्पद प्रयत्न चालू आहे.

### ...म्हणे धर्माचा अपमान

नरेंद्र मोदी यांनी या प्रकाराचा निषेध केला आहे. पण तेवढे पुरेसे नाही. मुळात ज्या प्रकारामुळे हा हल्ला झाला त्याविषयीही मोदींनी बोलायला हवे. मध्य प्रदेशातील खजुराहो हा पुरातन मंदिरांचा प्रदेश आहे. यामधील एका मंदिरातील विष्णूची मूर्ती भंगल्यामुळे तिचा जीर्णोध्दार करण्याची परवानगी मागणारी याचिका सर्वोच्च न्यायालयापुढे काही दिवसांपूर्वी आली होती. मात्र खजुराहो हे पुरातन वारसा किंवा हेरिटेज ठिकाण असल्याने त्याचा ताबा पुरातत्व खात्याकडे आहे. त्यांच्या कायद्यानुसार असा बदल केला जाऊ शकत नाही. त्यामुळे न्यायमूर्ती गवई यांनी याचिका फेटाळून लावली. तरीही याचिकाकर्त्यांनी आपला युक्तिवाद चालूच ठेवला. त्यावर गवई त्यांना म्हणाले की, कायद्यानुसार तर आता काही करता येणार नाही. आता त्यापलिकडे तुम्हीच तुमच्या देवाची प्रार्थना करा व काही होते आहे का पाहा. म्हटले तर ही थोडी गंमत होती, म्हटले तर वस्तुस्थितीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न होता. अगदी सामान्य माणसालाही हे कळेल की यात धर्माचा काहीही अपमान नव्हता. पण हिंदी पट्ट्यातील लोकांची डोकी फिरलेली आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपने त्यांच्या डोक्यात जे विष पेरले आहे ते आता चांगलेच पसरले आहे. त्यामुळे या मंडळींना कोणत्याही गोष्टीत आपल्या धर्माचा अपमान म्हणून कांगावा करण्याची सवय लागली आहे. त्यातच गवई हे धर्माने बौध्द आहेत. उत्तर भारतात जातीचा अहंकार व दलितांना तुच्छतेने वागवणे हे सर्व थरांमध्ये आजही कायम आहे. तोही राग या पाठीमागे असावा. यातून सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक वकिलांनी गवई यांच्या निषेधाचे ठराव केले व त्यासाठी निदर्शनेही केली. गवई यांनी आपल्याला सर्व धर्मांबद्दल आदर आहे व आपण अनेक देवळांनाही भेट देत असतो असा खुलासा करूनही त्यांच्यात काहीही फरक पडला नाही. त्याच मूर्ख जमावाचे प्रतिनिधी म्हणून राकेश यांनी सोमवारी बूट फेकण्याचा प्रयत्न केला.

### बस करा ही पेटवापेटवी

मोदी यांनी राकेश याचा निषेध करतानाच न्यायमूर्ती गवई यांचे उद्गार धर्माचा अपमान करणारे नव्हते हेही निःसंदिग्धपणे सांगायला हवे. पण मोदी ते करणार नाहीत. कारण त्यांना राकेश यांच्याइतकीच समज असलेल्या, धर्मांध व जात्यंध लोकांच्या आधाराने हिंदी पट्ट्यात मते मिळत असतात. याच लोकांच्या आधारे गौहत्या रक्षणाच्या मोहिमा चालवून दहशत माजवली जात असते. कावड यात्रेत मुस्लिमांची दुकाने फोडणारे व लुटणारे गुंडही याच राकेशचे भाईबंद असतात. त्यांना दुखावणे मोदी किंवा भागवत यांना परवडणारे नाही. खरे तर असल्या डोक्यात गायीचे शेण भरलेल्या तथाकथित सनातनी लोकांचे पुढारी होण्याची आपली इच्छा नाही असे या दोघांनी सांगायला हवे. पण तेवढी हिंमत ते कधीही दाखवू शकणार नाहीत. यामुळे राकेश यांच्या असल्या कृत्यांना संघ व भाजपच्या नेत्यांची अप्रत्यक्ष फूस व मूक संमती आहे असेच म्हणावे लागेल. याच रीतीचे विष स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळी या सनातनी मंडळींनी पसरवले. त्यातून देशाची फाळणी झाली व नंतर महात्मा गांधींची हत्या यांनीच घडवून आणली. आज महाराष्ट्रात भाजपचे नितेश राणे रोज उठून मुसलमानांना धमक्या देत असतात व देवेंद्र फडणवीस त्यावर गप्प बसतात. त्यातूनच मग नगर, अकोला, नागपूर, कोल्हापूर, यवत(पुणे) अशा ठिकाणी दंगली उसळल्या आहेत. हा वणवा आणखी भडकलाच तर तो फक्त मुस्लिम किंवा विरोधकांनाच नव्हे तर या तथाकथित सनातनी धर्मवाल्यांसकट सर्व समाजालाही जाळून टाकेल. त्यामुळे आता तरी भागवत, मोदी, फडणवीस अशा लोकांनी पेटवापेटवीचे हे उद्योग रोखायला हवेत. ही विकृती म्हणजे धर्म नव्हे हे स्पष्टपणे सांगायला हवे. आज बूट फेकला गेला आहे, उद्या अन्य कोणावर याच निमित्ताने गोळ्याही झाडल्या जाऊ लागतील. हे विष आपल्याच विचारातून पसरले आहे हे या नेत्यांनी मान्य करायला हवे. अन्यथा, त्यांनाच ही आग लावायची आहे असा अर्थ घेतला जाईल. लक्षात घ्या एरवी अशा घटनेत एखादा काँग्रेसवाला असता तर सर्व केंद्रीय मंत्री, फडणवीस ते भाजपचे बुद्रुक प्रवक्ते यांनी निषेधाचा पाऊस पाडला असता. पण आता बिलकुल सन्नाटा आहे. दुसरीकडे हाच बूट फेकणारा एखादा मुस्लिम असता तर पोलिसांनी त्याला सोडणे तर दूरच पण भयंकर कलमे लावून अटक केली असती. त्याच्या घरावर बुलडोझर फिरवला असता. भाजपवाल्यांनी सगळ्या मुस्लिमांना पुन्हा एकवार देशद्रोही ठरवले असते. आता हा बूटफेक्या सनातनी धर्माचे नाव घेत असल्याने सगळ्यांची दातखीळ बसली आहे.

विचार

# प्राप्तिकर परताव्यातून सायबर गुन्ह्याचे तंत्र

***आजच्या काळात सायबर सुरक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. प्रत्येक वापरकर्त्याने आपली वैयक्तिक माहिती जपून ठेवली पाहिजे आणि ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. करभरणेची तारीख उलटल्यानंतर प्राप्तीकर खात्याचा परतावा लोकांच्या खात्यात जमा होत असतो. याचा फायदा घेऊन सायबर गुन्हेगार भाबड्या करदात्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करतात. याबाबत सतर्क असायला हवे.***

**डॉ. दीपक शिकारपूर**



प्राप्तिकर खात्याकडून येणारा परतावा म्हणजे आर्थिक वर्षात भरलेला कर प्रत्यक्ष देय असलेल्या करापेक्षा जास्त असतो, तेव्हा सरकार परत करते ती अतिरिक्त रक्कम. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर, तुम्ही सरकारला गरजेपेक्षा जास्त कर दिल्यास परत मिळणारी जास्तीची रक्कम. चुकून देय करापेक्षा जास्त कर भरल्यास, टीडीएस कपात जास्त झाल्यास, कार्यालय किंवा बँकेने उत्पन्नावर (उदा. पगार, व्याजाचे उत्पन्न) जास्त टीडीएसकपात केल्यास असा परतावा मिळतो. करबचतीसाठी केलेल्या गुंतवणुकीची माहिती नंतर सादर केल्यास, कर गणनेमध्ये काही चूक झाल्यासही हे अनुभवायला मिळते. अशा वेळी मिळणारा परतावा बहुतेक वेळी थेट तुमच्या बँक खात्यात जमा केला जातो. अशा वेळी परतावा प्रक्रियेद्वारे प्राप्त होईल आणि लवकरच आपल्या खात्यात जमा होईल, अशी इमेल किंवा मेसेज येतो. याचा फायदा घेऊन सायबर गुन्हेगार भाबड्या करदात्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करतात. यासाठी सतर्क असणे जरुरीचे आहे. हा एक प्रकारचा सायबर घोटाळा आहे, जिथे सायबर गुन्हेगार प्राप्तिकर विभागाचे अधिकारी असल्याचा बनाव करतात. कर परतावा मिळणार असल्यास किंवा करगणनेत काही चूक झाली असल्याच्या खोट्या गोष्टी सांगून ते करदात्यांची गोपनीय आर्थिक माहिती मिळवतात. या प्रकारांना आळा घालणे महत्वाचे ठरते.

सहसा करदात्याला ईमेल किंवा इन्स्टंट मेसेजिंग ॲप्लिकेशनवरून एक मेसेज येतो, ज्यामध्ये तुमचा प्राप्तिकर परतावा थकीत आहे किंवा तुम्ही भरलेली कराची रक्कम चुकीची आहे किंवा प्राप्तिकर भरताना काही तरी चूक झाली आहे, असे दावे केलेले असतात. अशा मेसेजचा उद्देश करदात्याला घाबरवून तातडीने काही तरी करण्याची भावना निर्माण करणे हा असतो. मेसेजमध्ये एक लिंक असते, जी प्राप्तिकर विभागाच्या अधिकृत ईफायलिंग पोर्टलसारखी दिसते. करदात्याला प्राप्तिकर विभागाचे अधिकृत ॲप असल्याचा बनाव करून संबंधित सायबर गुन्हेगार एक एपिके फाइल डाऊनलोड करायला सांगतात, ज्याचा उपयोग प्राप्तिकराशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी असल्याचे सांगितले जाते. एकदा करदात्याने त्या लिंकवर क्लिक केले किंवा बनावट ॲप इन्स्टॉल केले की ते एका बनावट वेबपेजवर किंवा इंटरफेसवर जातात, जे सरकारी प्लॅटफॉर्मसारखे दिसते. इथे, त्यांना आपली बँक आणि आर्थिक माहिती तसेच वैयक्तिक माहिती भरण्यास सांगितले जाते. फसवणूक अधिक प्रभावी बनवण्यासाठी, घोटाळेबाज प्राप्तिकर विभागाचे अधिकारी किंवा हेल्पडेस्क प्रतिनिधी असल्याचे भासवून फोन करतात आणि करदात्याला बनावट ॲप इन्स्टॉल करण्यास किंवा लिंकवर क्लिक करण्यास आणि आवश्यक माहिती देण्यास सांगतात. एकदा आवश्यक माहिती मिळाली, की घोटाळेबाज त्याचा वापर अनधिकृत इलेक्ट्रॉनिक व्यवहार करण्यासाठी करतात. यामुळे करदात्याचे किंवा पीडिताचे आर्थिक नुकसान होते.

असे गुन्हे सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे तज्ज्ञांकडून सातत्याने खबरदारीचे काही उपाय सांगितले जातात. पहिला म्हणजे सत्यता तपासणे. प्राप्तिकर विभागाकडून पाठवल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही ईमेलची सत्यता नेहमी तपासावी. अशा संपर्काचा स्रोत काय आहे, याकडे लक्ष द्यावे. शंका असल्यास अशा मेसेजला प्रतिसाद देणे टाळावे. अनोळखी लिंकवर क्लिक करू नये किंवा फाइल डाऊनलोड करू नये. ईमेल किंवा इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर आलेल्या परतावा किंवा पेमेंटसंबंधित लिंकवर क्लिक करणे टाळावे. या लिंक बनावट वेबसाइट्सकडे घेऊन जाऊ शकतात किंवा फोनमध्ये मालवेअर डाऊनलोड करू शकतात. सामान्यजनांनी आपली संवेदनशील माहिती कधीही शेअर करू नये. पासवर्ड, कार्ड नंबर यासारखी संवेदनशील माहिती कोणाशीही शेअर करू नये. कोणताही अधिकृत सरकारी विभाग फोनकॉल, मेसेज किंवा ईमेलद्वारे ही माहिती कधीही मागत नाही. प्राप्तिकराची नोटीस किंवा परताव्याच्या अलर्टसंबंधी कोणताही मेसेज आल्यास थेट अधिकृत वेबसाइटवर जाऊन आपल्या खात्यात लॉग-इन करुन मेसेजची सत्यता तपासावी. फोनची ऑपरेटिंग सिस्टीम आणि ॲप्स नियमितपणे अपडेट ठेवावे, जेणेकरून सुरक्षाविषयक त्रुटी दूर होतील. तसेच विश्वासार्ह अँटीव्हायरस किंवा मोबाईल सुरक्षा ॲपचा वापर करावा, ज्यात रिअल-टाइम संरक्षणाची वैशिष्ट्ये असतील. असे घोटाळे, फसवणुकीचे प्रकार राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइनवर कळवावेत. यासाठी १९३० या क्रमांकावर कॉल करावा किंवा विभागाच्या वेबसाइटवर तक्रार नोंदवावी.सायबर गुन्हेगार आपले सावज कसे शोधतात हे इथे समजून घेणे महत्वाचे ठरते. सायबर गुन्हेगार आपल्या लक्ष्याचा शोध घेण्यासाठी अनेक पद्धती वापरतात. यामध्ये आता आर्टिफिशियल इंटेलिजन्सचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. बरेचदा सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून लोकांना हेरले जाते. यामध्ये लोकांच्या मानसिकतेचा फायदा घेतला जातो. उदाहरणार्थ, ओळखीचा बहाणा करणे. गुन्हेगार कुटुंबातील सदस्य किंवा मित्र असल्याचा दावा करतात आणि माहिती मिळवतात. बरेचदा ते तुमच्या मनात तातडीची गरज किंवा भीती निर्माण करतात, जसे की तुमचे बँक अकाउंट बंद होणार आहे किंवा तुमच्यावर कायदेशीर कारवाई होणार आहे, असे सांगून घाबरवले जाते, जेणेकरून तुम्ही घाबरून ते सांगतील ती कृती करता. बरेचदा सार्वजनिक माहिती आणि डेटा लीक केला जातो. आजकाल लोक सोशल मीडियावर खूप माहिती शेअर करतात. गुन्हेगार या माहितीचा वापर करतात. अनेकदा बँक खाते, आधार, पॅनची माहिती सोशल मीडियावर पाठवली जाते. हे नक्कीच धोकादायक आहे.

काही प्रसंगी सोशल मीडिया अकाउंट्सवरून वाढदिवस, कामाची जागा, छंद किंवा कुटुंबाची माहिती मिळवली जाते. या माहितीचा वापर करून ते पासवर्डचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतात. अनेकदा कंपन्यांच्या डेटाबेसमध्ये सायबर हल्ला होतो. त्यावेळी ग्राहकांची वैयक्तिक माहिती, जसे की ईमेल आयडी आणि पासवर्ड लीक होते. ही माहिती गुन्हेगार डार्क वेबवर विकत घेतात आणि नंतर दुसऱ्या हल्ल्यासाठी त्याचा वापर करतात.

बरेचदा आपणच अशा गुन्हेगारांची शिकार होतो. काही व्यक्ती किंवा कंपन्यांची सायबर सुरक्षा कमकुवत असते. या व्यक्ती सर्वात सोप्या शिकार असतात. बरेचदा आपण ठेवलेले सोपे पासवर्ड फसवणुकीला कारण ठरतात. १२३४५६ किंवा यासारखे सोपे पासवर्ड वापरणाऱ्या लोकांना सहज लक्ष्य केले जाऊ शकते. जुन्या किंवा अपडेट न केलेल्या सॉफ्टवेअरमध्ये अनेक कमतरता असतात. त्याचाही फायदा गुन्हेगार घेतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीनेही सायबर गुन्हेगार आपले हल्ले अधिक प्रभावी आणि वेगवान बनवतात. एआयचा वापर ते विविध प्रकारे करतात. फिशिंग हल्ले अधिक वैयक्तिक बनवणे, हा याचाच एक प्रकार. आधीचे फिशिंग ईमेल हे सहसा व्याकरण आणि स्पेलिंगच्या चुकांनी भरलेले असायचे. पण एआयच्या मदतीने आता असे ईमेल अत्यंत अचूक आणि तुमच्यासाठी खास तयार केल्यासारखे वाटतात. एआय यंत्रणा सोशल मीडियावरून माहिती गोळा करून, तुमच्या आवडींचा, सवयींचा अभ्यास करुन असे मेसेज तयार करू शकते. एआयचा वापर करून गुन्हेगार असे मालवेअर तयार करतात, जे आपोआप बदलतात. दुर्दैवाने पारंपारिक सुरक्षा सॉफ्टवेअर त्यांना पकडू शकत नाहीत. एआय टूल मोठ्या प्रमाणात इंटरनेटवरून डेटा गोळा करू शकतात. यामुळे कमी वेळात मोठ्या प्रमाणात लोकांची माहिती मिळवणे गुन्हेगारांसाठी सोपे झाले आहे. एआयच्या मदतीने आता ऑडिओ आणि व्हिडिओचा वापर करून एखाद्या व्यक्तीचा आवाज किंवा चेहरा हुबेहूब कॉपी करता येतो. याचा वापर करून ते फोन कॉल किंवा व्हिडिओ कॉलद्वारे लोकांना फसवतात. या पार्श्वभूमीवर आता सायबर सुरक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. प्रत्येक वापरकर्त्याने आपली वैयक्तिक माहिती जपून ठेवली पाहिजे आणि ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

चर्चा आजची

# रस्त्यावरील खड्डे म्हणजे दमदार कामगिरीची पोचपावती

**संतोष राऊळ**

पर्यटन क्षेत्रात अग्रेसर असलेला रायगड जिल्हा सध्या अनेक कारणांने चर्चेत येत आहे. येथील राजकारणासह रस्त्यांचा विषय चर्चेचे कारण बनत आहे. पर्यटकांना पर्यटन स्थळापर्यंत घेऊन जाणारा रस्ता त्यांचे कंबरडे मोडत आहे. रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता, असा प्रश्न नागरिकांसह पर्यटकांना पडत आहे. कारण जिल्ह्यातील महत्वाचे रस्तेच खड्ड्यांत हरवले आहेत. जिल्ह्यात महायुतीचे आमदार-खासदार असून देखील त्यांच्या दमदार कामगिरीपेक्षा येथील खड्डेच मोठे असल्याची चर्चा पर्यटकांसह स्थानिकांमधून होत आहे.

सध्या रायगड जिल्ह्यातील सर्वात जास्त चर्चेत असलेला रस्ता म्हणजे मुंबई-गोवा महामार्ग. हा महामार्ग रायगड जिल्ह्यातून जात असल्याने चाकरमान्यांसह रायगडकर देखील या मार्गाच्या दयनिय अवस्थेमुळे हैराण झाले आहेत. त्यातच आता जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या अलिबाग तालुक्याला देखील खड्ड्यांचे ग्रहण लागले आहे. अलिबाग शहरासह अलिबाग-वडखळ, अलिबाग-रोहा आणि अलिबाग-मुरूड रस्ता अक्षरशः खड्ड्यांत हरवला आहे. तो खड्ड्यात हरवला नसून दमदार कार्याची पोचपावती असल्याचे सर्वसामान्यांतून बोलले जात आहे. या मार्गावरून रोजचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे बेहाल होत आहेत. या मार्गावरून अवजड वाहनांची देखील मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. या ठिकाणचे रस्ते आधिच कमकूवत त्यात अवजड वाहनांचा भार, त्यामुळे या रस्त्यांची दरवर्षीच्या पावसाळ्यात अत्यंत वाईट परिस्थिती निर्माण होते. दुचाकी चालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मार्गावर खड्ड्यांत



खड्डे असून एक खड्डा चुकवायच्या नादात जीव गमवायची भीती असते. जर खड्डा चुकवला नाही तर कंबरडे मोडते. तसेच, वाहनाचे नुकसान होते ते वेगळेच.

या खड्डेमय रस्त्यांमुळे अपघाताचे सत्र दिवसेंदिवस वाढतच आहे. या अपघातांमध्ये गंभीर जखमी होऊन कायमच्या अपंगत्वाबरोबरच मृत्यू देखील होत आहेत. अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण असल्यामुळे या ठिकाणी जिल्ह्याभरातून नागरिक शासकीय कामांसाठी येथे येत असतात. तसेच, संपूर्ण राज्यभरातून पर्यटक अलिबागसह चौल, रेवदंडा, मुरूड या ठिकाणी पर्यटनासाठी येत असतात. कामापासून आराम, निवांतपणा अनुभवण्यासाठी आणि परिवारासोबत वेळ घालविण्यासाठी पर्यटक येथे येत असतात. परंतु, त्यांना मनस्तापाशिवाय दुसरे काहीच मिळत नाही. त्याचा परिणाम पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांवर होत आहे. दरवर्षी पावसाळ्यातील चार महिने पर्यटन व्यवसाय बंद असतो. परंतु, यंदाच्या वर्षी मे महिन्यातच पावसाने सुरूवात केली असून अद्यापपर्यंत थांबायचे नाव घेत नव्हता. आता कुठे पावसाने विश्रांती घेतली असून काही प्रमाणात पर्यटकांची रेलचेल सुरू झाली आहे. परंतु, त्याच्यावर खड्ड्यांचे विघ्न येत आहे. त्यामुळे पर्यटकांनी पाठ फिरवली तर त्यावर अवलंबून राहणाऱ्यांवर उपासमारिची वेळ येईल हे नक्की, असे व्यावसायिकांकडून बोलले जात आहे.

गेल्या वर्षी विधानसभा आणि राज्यसभा निवडणूकींपूर्वी उमेदवारांनी प्रचंड आश्वासने दिली होती. त्यात जिल्ह्यातील रस्त्यांचा देखील समावेश होता. परंतु, निवडणुका पार पडून ते निवडून आले तरी येथील रस्त्यांची परिस्थिती होती त्यापेक्षा दयनिय झाली आहे. निवडून आलेले आमदार-खासदार, लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी याच महामार्गावरून प्रवास करत असतात. कदाचित ते महागड्या काळ्या काचेच्या गाडीतून प्रवास करत असल्यामुळे त्यांना खड्ड्याच्या झळा लागत नसाव्यात, असे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य जनतेतून बोलले जात आहे. आता त्या रस्त्यासाठी सर्वसामान्य जनतेला रस्त्यावर उतरावे लागत आहे. तीव्र आंदोलन छेडल्यास संबंधित प्रशासनाला देखील महागड्या गाडीतून खड्डेमय रस्त्यावर उतरावे लागते. हेच काम लोकप्रतिनिधींनी केले असते तर सर्व सामान्यांवर हि वेळ आलीच नसती. त्यांच्याकडून वारंवार दमदार कामगिरीचा उल्लेख केला जातो. त्यामुळे जिल्ह्यासह अलिबाग शहरातील खड्डे म्हणजे लोकप्रतिनिधींची दमदार कामगिरी, असे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

लोकसंसद

## बुद्धिबळपटू हिकारू नाकामुराकडून सौजन्याची ऐशी तैशी



अमेरिकेतील टेक्सासमधील आर्लिंग्टन येथील एस्पोर्ट्स स्टेडियम येथे नुकत्याच पार पडलेल्या एका मैत्रीपूर्ण प्रदर्शनीय बुद्धिबळ स्पर्धेत अमेरिकेच्या क्रिस्टोफर हिकारू नाकामुरा याने भारताच्या विश्वविजेत्या डी. गुकेश याला पराभूत केल्यानंतर उन्मादाच्या भरात येऊन त्याचा राजा (किंग) प्रेक्षकांच्या गर्दीत भिरकावून दिला. नाकामुराच्या या वादग्रस्त कृतीमुळे बुद्धिबळ चाहत्यांमध्ये नाराजी पसरली असून अनेकांनी त्याला ट्रोल करायला सुरुवात केली आहे. रशियन बुद्धिबळपटू व्लादिमीर क्रॅमनिक याने ही 'आधुनिक बुद्धिबळाच्या अधोगतीची सुरुवात' असल्याचे म्हणत नाकामुरावर टीका केली. प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी संयम, दूरदृष्टी, चिकाटी आणि नियोजनाची आवश्यकता असलेला तसेच बौद्धिक कौशल्यावर आधारलेला एक शांततेचा खेळ असे ज्याचे वर्णन केले जाते त्या बुद्धिबळ खेळात नाकामुराच्या वादग्रस्त कृतीने खेळ भावनेला तडा गेला आहे. विशेष म्हणजे आयोजकांनी नाकामुराच्या कृतीचे समर्थन केले असून जागतिक व्यासपीठावर बुद्धिबळाचा खेळ विकसित होत असताना अधिकाधिक प्रेक्षकांना या खेळाकडे आकर्षित करण्यासाठी या बुद्धिबळ स्पर्धेला मनोरंजनाचे स्वरूप दिल्याचे त्यांनी म्हटले आहे. काही खेळाडू आणि आयोजकांच्या केवळ दिखाऊपणा आणण्याच्या इच्छेसाठी या बुद्धिबळ स्पर्धेला अधिक नाट्यमय, आकर्षक कार्यक्रमाचा रंग देण्यात आला, तो बुद्धिबळाच्या पारंपारिक, संयमी स्वरूपाशी पूर्णतः विसंगत होता.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# भारतीय हवाई दल दिन

भारतीय हवाई दल दिन दरवर्षी ८ ऑक्टोबरला साजरा केला जातो, जो १९३२ साली भारतीय हवाई दलाच्या स्थापनेची आठवण करून देतो. या दिवसाचा उद्देश हवाई दलाच्या शौर्य, समर्पण, आणि त्यागाला सन्मान देणे आहे. भारतीय हवाई दल देशाच्या हवाई संरक्षणासाठी आणि आंतरराष्ट्रीय शांतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारतीय हवाई दलाने विविध युद्धांमध्ये आणि आपत्ती व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेषतः १९६५ आणि १९७१ च्या युद्धांमध्ये, तसेच कारगिल युद्धात हवाई दलाने देशाच्या संरक्षणात निर्णायक भूमिका निभावली. आधुनिक तंत्रज्ञान, अत्याधुनिक लढाऊ विमानं, आणि कुशल पायलट्स यांच्या बळावर भारतीय हवाई दल जगातील प्रमुख हवाई दलांमध्ये गणले जाते. हवाई दल दिनाच्या निमित्ताने विविध ठिकाणी विमानांचे भव्य प्रदर्शन, पथ संचलन, आणि शौर्य पदके प्रदान समारंभ आयोजित केले जातात. हा दिवस भारतीय हवाई दलाच्या पराक्रमाला आणि देशाच्या संरक्षणातील त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहण्याचा एक खास दिवस आहे. भारतीय हवाई दल हे जगभरातील सर्वात शक्तिशाली हवाई दलांपैकी एक आहे. भारतीय हवाई दलाने अनेकदा आपल्या शौर्य आणि गौरवास्पद कामगिरीने भारतीयांना अभिमान वाटावा असे क्षण दिले आहेत. भारतीय हवाई दलाचे कार्य आणि देशासाठी हवाई दलाने दिलेल्या योगदानाचे कौतूक करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. त्याच बरोबर भारतीय हवाई दलाचा स्थापना दिवसही या दिवशी साजरा केला जातो. यात दिवशी भारतीय सैन्याच्या देशभरातील हवाई दलाच्या लढाऊ विमानाद्वारे प्रात्यक्षिक दाखवले जातात आणि भारकतीय वायुसेनेद्वारा शक्ती प्रदर्शन केले जाते. भारतीय हवाई दलाने १९६० मध्ये पहिला सर्वात मोठा संघर्ष केला. जेव्हा बेल्जियमची काँगोवरील ७५ वर्षांची सत्ता अचानक संपुष्टात आली आणि देशात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार आणि बंडखोरांच्या कारवाया सुरू झाल्या. संयुक्त राष्ट्रांच्या काँगो मोहिमेला मदत करण्याच्या उद्देशाने भारतीय हवाई दलातील एक पथक पाठवण्यात आले. स्क्वॉड्रनने नोव्हेंबरमध्ये आपल्या मोहिमेला सुरुवात केली. कॅनबेरा, लिओपोल्डविले आणि कमिना येथील बंडखोरांचा पाडाव करत संयुक्त राष्ट्रांच्या ग्राउंड तुकडीसाठी एकमेव हवाई तळ बनले. हे भारतीय हवाई दलाचे मोठे यश होते. १९५० पासून, भारतीय वायुसेना शेजारच्या पाकिस्तानशी चार युद्धांमध्ये सामील आहे. भारतीय हवाई दलाने केलेल्या प्रमुख ऑपरेशन्समध्ये ऑपरेशन विजय, ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन कॅक्टस आणि ऑपरेशन पुमलाई यांचा समावेश आहे. भारतीय वायुसेनेचे मिशन शत्रू सैन्याशी लढण्यापलीकडे विस्तारते, भारतीय वायुसेने संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये भाग घेते.लष्कर आणि नौदलाच्या समन्वयाने हवाई धोक्यांपासून राष्ट्र आणि त्याच्या हवाई क्षेत्राचे रक्षण करणे हे भारतीय हवाई दलाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. नैसर्गिक आपत्ती आणि अंतर्गत अशांततेच्या वेळी नागरी शक्तीला मदत करणे हे त्याचे दुसरे उद्दिष्ट आहे. भारतीय हवाई दल लढाऊ क्षेत्रामध्ये भारतीय लष्कराच्या जवानांना जवळचे हवाई सहाय्य प्रदान करते आणि सामरिक आणि सामरिक एअरलिफ्ट क्षमता देखील प्रदान करते. भारतीय हवाई दल भारतीय सैन्यासाठी रणनीतिक विमान किंवा दुय्यम एअरलिफ्ट देखील प्रदान करते. भारतीय हवाई दल भारतीय सशस्त्र दलाच्या इतर दोन शाखा, अंतराळ विभाग आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्या सहकार्याने एकात्मिक अंतराळ शाखा देखील चालवते. नैसर्गिक आपत्तीच्या काळात बचाव-मदत कार्ये चालवणे. अस्थिरता किंवा इतर समस्या उद्भवल्यास परदेशातून भारतीय नागरिकांना बाहेर काढणे.

# रिक्षाचालकांनी बुजविले खड्डे

## ● नगर परिषदेचा निधी, कशासाठी?, संतप्त नागरिकांचा सवाल

| पालघर | प्रतिनिधी |

पालघर पूर्वेकडील सेंट जॉन अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावर पावसाळ्यापूर्वीपासून जीवघेणे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे नगर परिषदेची निष्क्रियता उघड होत आहे. त्यामुळे या भागातील रिक्षाचालकांनी स्वखर्चाने खड्डे बुजवून रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती केली. पालघर शहराच्या विकासासाठी नेमलेल्या नगर परिषदेचा निधी आणि कर्तव्य कशासाठी आहे, असा संतप्त सवाल या घटनेनंतर नागरिक विचारत आहेत.

पालघर पूर्वेकडील सेंट जॉन महाविद्यालयापासून घोलविरा नाक्यापर्यंतचा रस्ता पावसाळ्यापूर्वी काँक्रिट करण्यात आला आहे. मात्र तरीही, घोलविरा नाक्यापासून स्टेशनकडे जाणारा मुख्य रस्ता आजही



अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. या रस्त्यावर चार ते पाच फूट रुंद आणि दीड फूट खोल खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात नगर परिषदेने दोन वेळा सिमेंट मिश्रित खडी टाकून तात्पुरती मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, ती पावसाच्या पाण्यासोबत वाहून गेल्याने खड्डे जैसे थे राहिले. इतकेच नव्हे, तर टाकलेली खडी वाहनांच्या चाकाखाली येऊन उडून पादचारी आणि शेजारील वाहनचालकांना लागल्याच्या घटनाही वारंवार घडल्या आहेत. ज्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे.

रोजच्या जीवघेण्या त्रासाला कंटाळून वेवूर, वीरेंद्रनगर आणि डुंगीपाडा परिसरातील रिक्षाचालकांनी एकत्र येऊन एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. प्रशासनाच्या भरवशावर न राहता, त्यांनी स्वत:च्या खर्चाने माती, खडी आणि सिमेंटचे मिश्रण घेतले आणि रविवारी घोलविरा फॉरेस्ट ऑफिस समोरील रस्त्यावर तसेच सेंट जॉन रस्त्यावरील काही प्रमुख खड्ड्यांमध्ये टाकून दुरुस्तीचा प्रयत्न केला.

### रस्त्यांची दुरवस्था कायम राहणार?

**गणपती, नवरात्र यांसारखे सण नागरिकांना याच खड्ड्यांतून प्रवास करत साजरे करावे लागले. आता दोन आठवड्यांवर आलेल्या दिवाळीसारख्या मोठ्या सणालाही रस्त्यावरील खड्ड्यांचे कायम राहण्याचे चित्र दिसत आहे. या गंभीर परिस्थितीमुळे नागरिक आणि रिक्षाचालकांचा संताप शिगेला पोहोचला आहे.**


**"लोकप्रतिनिधी, जिल्हा व नगर परिषद प्रशासन याकडे डोळेझाक करत आहेत. त्यामुळे याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. नगरपरिषदेचा निधी जनतेच्या कामांसाठीच वापर होत नसल्याने नागरिकांनी कोणाकडे दाद मागायची. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन जर कामात पुढाकार घेत नसेल, तर अशा संतप्त प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक आहे.**
**– मनोज घरत, अध्यक्ष, रिक्षा चालक–मालक संघटना"**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**८ ऑक्टोबर**

१) श्रीम.सुधा गजेंद्र दळी भाजीमार्केट, अलिबाग, ८-१०-१९४४
२) श्री.गोपाळ वामन लिमये अलिबाग, ८-१०-१९३१

### सुवर्णकण



मन आणि बुद्धी देवावरील असीम प्रेमाने भरून गेली पाहिजेत. केवळ मन नव्हे तर बुद्धीसकट मन भगवंताकडे लागले पाहिजे आज विज्ञानाच्या प्रचंड झेपे मुळे देवा विषयी विचार करायला माणसाला वेळच नाही.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

### रमेश भोसले यांचे निधन

| सुकेळी | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील मढाळी येथील रमेश भोसले यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी रविवारी (दि.५) अल्पशा आजाराने झाले. त्यांच्यावर सोमवारी मढाळी येथील वैकुंठभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. रमेश भोसले यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी,



सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार दि.१४ रोजी, तर बारावे गुरूवार दि.१६ ऑक्टोंबर रोजी राहत्या घरी मढाळी येथे करण्यात येणार असल्याचे भोसले परिवाराकडून सांगण्यात आले आहे.

# वृद्ध, मनोरुग्णांसमवेत कोजागिरी साजरी

## ●विविध प्रकारचे साहित्य, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

लायन्स क्लब खालापूरने विविध उपक्रम हाती घेत असतांना एक पाउल पुढे टाकले आहे. महड येथे असलेले वृद्धाश्रम, तसेच मनोरुग्ण संस्था महड येथे सर्व पदाधिकारी जाऊन त्यांच्या समवेत कोजागिरी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सणाच्या निमित्ताने त्यांचे अशिर्वाद घ्यावे, तसेच त्यांना आधार द्यावे, या उद्दात विचारांतून हा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

महड येथे आदित्य वृद्धाश्रम असून यामध्ये महिला वर्ग असून त्यांची देखरेख येथे होत आहे. मात्र प्रत्येक सण आपल्या कुटुंबासमवेत घालावावे, अशी



त्यांची सुद्धा मनोकामना असते. मात्र त्यांच्यातील ही उणीव भरुन काढावी, त्यांच्या समवेत काही वेळ घालवून मनोबळ वाढवून गप्पांची रंगत आणली. हा सण त्यांच्यासमवेत साजरा करावा यासाठी त्यांना जीवनावश्यक वस्तू वाटप करण्यात आल्या.

तसेच, मनचकशू मनोरुग्ण संस्था महड येथेही हा सण साजरा करण्यात आला. यावेळी मसाला दूध, फळे, पाण्याच्या बॉटल तसेच डायपर पॅड, व प्राथमिक उपचारचे औषध साहित्य देण्यात आले. यावेळी लायन्स क्लब खालापूर अध्यक्ष किशोर पाटील, प्रोजेक्ट हेड शिवानी जंगम, अशोक पाटील, भरत पाटील, हरिभाऊ जाधव, ऋषी चाळके उपस्थित होते.

# किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड तालुक्यातील श्रीशिवप्रेमी शिवभक्त मित्र मंडळ मजगाव नांदगावतर्फे दिपावलीच्या सुट्टीमध्ये तालुकास्तरीय किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धकांनी किल्ले आपल्या स्वतःच्या मालकीच्या जागेत उभारणे आवश्यक आहे. इच्छुक स्पर्धकांनी दि.१६ ऑक्टोबरपर्यत आपली नावे मंडळाकडे द्यावीत. किल्ले १८ ऑक्टोबरपर्यंत उभारुन पूर्ण करावेत. शिवदुर्ग विज्ञान व गडकिल्ल्यांची नाविन्यपूर्ण कल्पनेनुसार त्यांची उभारणी, देखावा, मातीकाम व इतर सजावटींना विशेष प्राधान्य देण्यात येईल. किल्ले हे स्वहस्ते व नैसर्गिक साधनांचा वापर करुन उभारावेत. त्यात प्लॅस्टिकचा वापर करू नये. उभारलेल्या किल्ल्याची ऐतिहासिक माहिती देणे बंधनकारक आहे. किल्ल्यांचे दि. १९ ते २३ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान परीक्षण केले जाईल. स्पर्धेत विजयी होणाऱ्या प्रथम ३ स्पर्धकांना व उत्तेजनार्थ ३ स्पर्धकांना बक्षिसे देण्यात येतील. मुलीसांठी स्वतंत्र बक्षीस देण्यात येईल.

तसेच, स्पर्धक हे इयत्ता चौथी व पदवीपर्यंत शिक्षण घेणारे असावेत. नाव नोंदणी व संपर्कासाठी– आशिष बुल्लु – ८२३२७५६६८, नाथा गिरणेकर – ९२२५४८७८४४, समिर माळी – ८२३७७०२५९५, योगेश घरत – ७८२१०२१२०४, नितेश कांबळे – ८१४९२४५३५८ या क्रमांकावर संपर्क करावा.



# श्रमदानातून बुजविले रस्त्यावरील खड्डे

| पालघर | प्रतिनिधी |

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त ग्रुप ग्रामपंचायत वावर वांगणी येथे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या विशेष दिनी वावर वांगणी ग्रामपंचायतमधील ग्रामस्थांनी श्रमदानातून मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजवले आहेत.

मुसळधार पावसामुळे वावर ते जव्हार मुख्य रस्त्यावर ठीक ठिकाणी दरडी कोसळून रस्ते बंद झाले होते. तर काही मुख्य रस्त्यावरील मोठमोठे खड्डे हे आधीच असल्यामुळे याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने या रस्त्यावरील प्रवास करणे हे खूप धोकादायक ठरत होते. तसेच अपघाताची शक्यता जास्तीत जास्त असल्याने गुरुवारी (दि.०२) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त वावर वांगणी ग्रामस्थांनी एक ध्येय ठेवून स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी एक दिवस श्रमदान करून रस्त्यावरील मोठमोठे खड्डे बुजवले.

यामध्ये घोडीपाडा येथे मुसळधार पावसामुळे दरड कोसळून रस्ता पूर्णपणे बंद झाला होता. हा रस्ता वावर वांगणी ग्रामस्थांनी श्रमदानातून पूर्णपणे मोकळा केला. तसेच लेंडी नदी जवळील वांगणी रस्त्यावर वरचे मोठे मोठे खड्डे हे श्रमदानातून बुजवले गेले. बेहेडगावा जवळील पूर्णपणे रस्ता हा मुसळधार पावसामुळे खाली गेल्याने हादेखील रस्ता तात्पुरता वाहने ये–जा करण्यासाठी दुरुस्त केला.

### तरुणीची छेड काढणारा अटकेत

**नवी मुंबई** : वाशी रेल्वे स्थानकावर १९ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीशी मोबाईलवर बोलत होती. यावेळी आरोपी तिच्या शेजारी येऊन उभा राहिला. त्याने तिला अयोग्य रीतीने स्पर्श केला. यावर तरुणीने थेट स्थानकावर तैनात असलेल्या महिला जीआरपी कर्मचाऱ्यांना घडलेला प्रकार सांगितला. परंतू, आरोपीने तोपर्यंत घटनास्थळावरुन पळ काढला होता. तरुणीने जीआरपी कार्यालयात तक्रार नोंदवली असता जीआरपी पोलिसांनी आरोपीला अटक केली.

# चारिझेन फाउंडेशनतर्फे दप्तरे वाटप

| माणगाव | प्रतिनिधी |

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या माणगाव चारिझेन फाउंडेशनतर्फे तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा बामणोली येथील विद्यार्थ्यांना मंगळवारी (दि.७) दप्तरे वाटप करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

चारिझेन फाउंडेशन हे रायगड जिल्ह्यात बहुजन समाजात सामाजिक बांधिलकी ठेऊन आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन सातत्याने सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत. माणगाव तालुक्यात या फाउंडेशनमार्फत महिलांसाठी



शिलाई कोर्स, विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप,टिशर्ट वाटप,रक्तदान शिबीर असे विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत.

आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फाऊंडेशन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले. हे फाउंडेशन बहुजन समाजात सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून निस्वार्थीपणे आपले कार्य करीत आहे. तालुक्यातील बामणोली येथील राजिप शाळेच्या विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे दप्तरे फाऊंडेशनने देऊन या विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला.

# ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात

| भाकरवड | प्रतिनिधी |

ज्येष्ठ नागरिक संघटना कुर्डूस विभागातर्फे ज्येष्ठ नागरिक दिन रविवारी (दि.५) उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम कुर्डूस येथील जेष्ठ नागरिक भवन प्रांगणात आयोजित करण्यात आला होता.

याठिकाणी झाड कुणीही तोडू नका, पाप पदरी घेऊ नका, वेतन खाऊन काम टाळणे, हा देशाचा द्रोह असे, माणसा माणसा जागा हो, देशाचा एक धागा हो, उणे कुणाचे दिसता किंचित, देत दवंडी पिटू नका, निसर्गाची मैत्री करा, झाडे लावा झाडे जगवा, असे व्यसन मुक्ती, प्रदूषण रहित निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सुंदर स्लोगन लावण्यात आले होते. विशेष म्हणजे जागतिक स्तरावर कुर्डूस परिसरात विहिरीवरील दहीहंडी फोडण्याचा विक्रम आकाश पाटील यांनी केला होता. त्याचा यथोचित सत्कार यावेळी करण्यात आला.

मनोगत व्यक्त करताना जेष्ठ नागरिक यांच्या समस्याचे निवारण करण्यासाठी शासन अनेक विविध उपक्रम राबविले जात आहेत त्यांचा फायदा घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन करण्यात आले. तसेच, कोणत्याही प्रकारची



अडचण आल्यास सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहनही यावेळी आपले विचार मांडताना जिल्हा अध्यक्ष सुरेश पालकर यांनी आवर्जून सांगितले. तसेच, राज्य सरकारने जेष्ठ नागरिक लोकांना ज्या योजना जाहीर केल्या आहेत, त्या योजना सरकारने अंमलबजावणी करून अमलात आणाव्यात. त्याची गरज वयोवृद्ध लोकांना तत्काळ मिळावी, अशी आशा व्यक्त केली.

कार्यक्रमासाठी जेष्ठ नागरिक, जेष्ठ महिला आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### संगिता खानावकर यांना पुरस्कार

**कोर्लई** : रोहा–कोलाड येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षण समिती (रायगड) पुरस्कार–२०२५ देण्यात आले. यावेळी मुरुड तालुक्यातील बोर्ली येथील रहिवासी नांदगाव प्राथमिक शाळा क्र.१ च्या शिक्षिका संगिता उदय खानावकर यांना महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षण समिती (रायगड) चा गुरुगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संगीता खानावकर यांना या पूर्वी २०२३–२४ मध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग, रायगड शाखा यांच्या वतीने जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला होता. आपल्याला महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षण समिती (रायगड) चा गुरुगौरव पुरस्कार–२०२५ मिळाल्याबद्दल संगिता खानावकर यांनी समाधान व्यक्त केले. तसेच, शिक्षण क्षेत्रात आपले मोलाचे योगदान राहील, असे सांगितले. त्यांना मिळालेल्या पुरस्काराचे सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच आप्तेष्ट नातेवाईक मित्र परिवार व पदाधिकारी शिक्षक बांधवांकडून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.





### ज्येष्ठ नागरिकांची उटणे बनविण्याची लगबग

**पनवेल** : पनवेलच्या ज्येष्ठ नागरिक संघतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर खास आयुर्वेदिक सुगंधित उटणे तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे. संघाच्या हॉलमध्ये ज्येष्ठ नागरिक उत्साहाने उटणे बनवण्याचे काम करत आहेत. हळद, चंदन, केशर, गुलाबपाणी अशा नैसर्गिक घटकांचा वापर करून हे उटणे बनवले जाते. 'अजून आम्ही तरुण आहोत' या उत्साही भावनेने सर्व जण कार्यरत असून, या उपक्रमातून संघाला आर्थिक मदतही मिळते. दरवर्षीप्रमाणे यंदाही नागरिक या उटण्याला मोठी पसंती देत आहेत.



### शालोपयोगी साहित्याचे वाटप

**रसायनी** : रसायनी पाताळगंगा परिसरातील अतुल दत्तात्रेय मालकर यांच्या प्रयत्नातून तसेच, लायन्स क्लब ऑफ पनवेल सर्गम यांच्यामार्फत राजिप शाळा तळवली व राजिप शाळा वडगाव डोंगरवाडी येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना टिफीन बॉक्स, कंपास पाउच, पेन, पट्टी, खोडरबर व इतर साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेह–यावर समाधानाचे वातावरण दिसून आले. यावेळी राजिप शाळा तळवली येथील मुख्याध्यापक बोरगे, उपशिक्षक मांडे तसेच लायन्स क्लब ऑफ पनवेल सर्गमचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, सदस्य गोडसे, गावातील सामाजिक कार्यकर्ते मधुकर मालकर, अतुल मालकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनिल वाघे शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष प्रभाकर वाघे व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच, वडगाव डोंगरवाडी येथील मुख्याध्यापिका पाटील, उपशिक्षिका मुंढे, ग्रामस्थ उपस्थित होते. लायन्स क्लब ऑफ पनवेल सर्गम व सामाजिक कार्यकर्ते अतुल मालकर यांच्यामार्फत डोंगरवाडीला एक उत्तम शाळा तयार व्हावी, यासाठी योग्य ते प्रयत्न केले जातील, असे सांगण्यात आले. दोन्ही ठिकाणी कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.

### श्रीधर गदमले यांचे निधन

**शिहू** : शिहू गावचे कर्तव्यनिष्ठ पोलीस पाटील श्रीधर धर्मा गदमले यांचे शुक्रवारी (दि.३) वयाच्या ५८ व्या वर्षी आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, आई, सुना, बहिणी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिवारासह शिहू गावावर शोककला पसरली आहे. विभागात कितीही मोठे तंटे, वाद असो ते हुशारीने सोडवण्यात त्यांचा हातखंडा होता. एक न्यायप्रिय, तरुणांना संघटित ठेवणार, गावात एकोपा कायम ठेवणार व्यक्ती हरपल्याने सर्वत्र दुःख व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अंतिम दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि. १२ ऑक्टॉबर रोजी, तर उत्तरकार्य बुधवार दि.१५ ऑक्टॉबर रोजी शिहू येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती कुटुंबियांकडून देण्यात आली.





### पथनाट्याव्दारे जनजागृती

**रसायनी** : आंतरराष्ट्रीय बजरंग दल सावळे रसायनी यांच्यावतीने करुणा केदारी यांच्या मार्गदर्शनाखाली कोजागरी पौर्णिमेच्या निमित्ताने लव जिहाद, गो हत्या, धर्मांतरण इत्यादी विषयांवर पथ नाट्याच्या रूपाने जनजागृती करण्यात आली. सुविधा तुळशीदास कर्णेकर आणि करुणा क्रांतीश्याम गाताडे या बालकलाकारांनी पथनाट्यात अभिनय केला. याप्रसंगी सचिन खुळे (कोकण प्रांत महामंत्री), भक्तीताई भाबळ (मातृ शक्ती रायगड अध्यक्ष), जनार्दन मालुसरे, प्रशांत तांबोळी, रवींद्र ठाकूर, करण गायकवाड, सुभाष कोकणे तसेच सावळे गावातील बजरंगी जयवंत म्हात्रे, संजय केदारी, नामदेव केदारी, झिंग आणि समस्त गावकरी उपस्थित होते.

## दिंडीतून पर्यावरण संरक्षणाचा संदेश | हजारो भाविक भक्तगण सहभागी

# वसुंधरा पायी दिंडीचे जल्लोषात स्वागत

| रसायनी | प्रतिनिधी |

नाणिजधाम येथील जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या रामानंद संप्रदायाच्या वतीने उपपीठ मुंबई ते नाणीजधाम रत्नागिरी या वसुंधरा पायी दिंडीचे रायगडमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. या वसुंधरा पायी दिंडीचे ठिकठीकाणी ढोल ताशांच्या गजरात तसेच लेझीम पथकांच्या उपस्थितीत जोरदार स्वागत करण्यात आले. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी तसेच या वसुंधरा पायी दिंडीचे स्वागत करण्यासाठी माजी नगरसेविका आरती केतन नवघरे, प्राध्यापक सुनिल निकुंभ नाणीजधाम मुख्य पिठातील पदाधिकारी आणि भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वसुंधरा पायी



दिंडीच्या निवासस्थानी वृक्षारोपण करण्यात आले.

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली 'पर्यावरणाची करु रक्षा मग पृथ्वीची होईल सुरक्षा' अशा घोषणा करत वसुंधरा पायी दिंडीचे व्यापक स्वरूपात आयोजन करण्यात आलेले आहे. पर्यावरणाचा संदेश देत सुमारे दोन हजार भाविक भक्तगण या दिंडीत सहभागी झाले आहेत. वसुंधरा पायी दिंडीच्या माध्यमातून ग्लोबल वार्मिंग जनजागृती करत तसेच, अध्यात्म आणि सामाजिक जनजागरण करत दररोज २५ किलोमीटर पायी प्रवास करत करत नाणीजधामकडे ही दिंडी मार्गस्थ होणार आहे.

दि.२१ ऑक्टोबर रोजी रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या जन्मोत्सवासाठी श्री क्षेत्र नाणीजधाम येथे पोहोचणार आहेत.

### ग्लोबल वार्मिंगविषयी जनजागृती

ही दिंडी ग्लोबल वार्मिंगचे धोके काय आहेत? पर्यावरणाचा समतोल कसा राखावा, निसर्गाचे रक्षण करावे, पृथ्वी रक्षण करावे, प्लास्टिक वापर करू नका, झाडे लावा झाडे वाचवा, झाडे तोडू नका, प्रदूषण टाळा, नदी नाले स्वच्छ ठेवा, परिसरात स्वच्छता राखा, असे संदेश देणारे फलक हातात घेऊन चालणारे युवायुवती जनजागृती करत आहेत. त्याचप्रमाणे ग्लोबल वार्मिंग वे पथनाट्य सादर करत जनजागृती करत आहेत.

### हजारो झाडांचे वृक्षारोपण

दिंडी महाराष्ट्रातील बहुतांश भागातून हजारो गावातून अनेक तालुक्यातून, जिल्ह्यांतून जात आहेत. या प्रवासादरम्यान जेथे दिंडी दिवसात चार वेळा नाश्ता व जेवण करण्यासाठी थांबते, त्या ठिकाणी प्रतिष्ठीत मान्यवरांच्या हस्ते हजारो झाडाचे वृक्षारोपण करण्यात येत आहे. रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सूक्ष्म नियोजनानुसार या पायी चालणाऱ्या यात्रिकीना पर्यावरण संवर्धनविषयी संदेश देणारे विशेष गणवेश देण्यात आले आहे.

## निवडक

### अखिल भजन संप्रदाय हितवर्धक मंडळाची कार्यकारणी जाहीर



**आगरदांडा :** अखिल भजन संप्रदाय हितवर्धक मंडळ महाराष्ट्र राज्य व मुरुड तालुका भजन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच आयोजित केलेल्या भजनी बुवांच्या मेळाव्यात मुरुड, अलिबाग व रोहा तालुका प्रमुखपदी नांदगावाचे भजनी बुवा विद्याधर रमेश चोरघे यांची एकमताने निवड करण्यात आली. यशवंतनगर पंचक्रोशी आगरी समाजाच्या उसरोली येथील सभागृहात शनिवारी झालेल्या भजनी बुवांच्या मेळाव्याला दोनशे पन्नास भजनी बुवा, मृदंग, पखवाज वादक व भजन प्रेमी मंडळी उपस्थित होते. या प्रसंगी मुरुड, अलिबाग व रोहा या तीन तालुक्याच्या भजन मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाच्या सचिवपदी सागर राऊत तर संपर्क प्रमुख म्हणून बुवा नरेश रमेश भेर्ले यांचीही यावेळी निवड करण्यात आली. अखिल भजन संप्रदाय हितवर्धक मंडळाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष भगवान लोकरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष सुनील लब्दे, गोपीनाथ बागवे, अनंत सावंत, शंकर राऊत, भरत बेलोसे, गोरख कुमरोटकर, बाळाराम पाटील, अरुण बागडे, मंदार मुंबईकर, हरिश्चंद्र माळी, रमेश दिवेकर, अरविंद शेडगे, रमेश बेनकर, चेतन पाटील, सुरेश दळवी, शैलेश काते, चणेरा, खारिकवाडा, माजगाव, मोरे ,खारदोडकुले आदी परिसरातील भजन मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर राऊत यांनी तर आभार प्रदर्शन विद्याधर चोरघे यांनी केले.



### महिलांची आरोग्य तपासणी

**नागोठणे :** नागोठणे लायन्स क्लबतर्फे आणि आयकेएस केअर फाऊंडेशन व क्षितीज फाऊंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने नागोठणे शहर व परिसरातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषोधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ११८ महिलांची डायबिटीस, ब्लडप्रेशर व हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. तसेच येथील डॉ नेल्सन मंडेला निवासी आश्रम शाळेतील २५ छोट्या मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हिमोग्लोबीन कमी आढळलेल्या ५५ महिलांना यावेळी मोफत औषधे देण्यात आली असून या महिलांची ३ महिन्यानंतर पुन्हा तपासणी करण्यात येणार आहे. यावेळी सुष्मिता सित्याळकर, विवेक सुभेकर, सखाराम ताडकर, डॉ. विक्रांत दळवी, डॉ. वसुधा बागुल, प्रदिप कदम, नेहा कदम, प्रकाश जैन, यशवंत चित्रे, अनिल गीते, विलास चौलकर, जयराम पवार, दिपक लोणारी, विजय शहासन, ऋतुजा पांचाळ, सिध्देश काळे, निलोफर पानसरे आदींसह सर्व लायन्स मेंबर व महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमात सुष्मिता सित्याळकर, डॉ. विक्रांत दळवी, नेहा कदम आदींनी महिलांना बहुमोल मार्गदर्शन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. विवेक सुभेकर यांनी केले.



### भिडे यांचा अमृतमहोत्सवी सोहळा

**अलिबाग :** आयुष्याची चार दशके ज्ञानदानात वेचलेल्या, आपल्या विद्यार्थीप्रिय स्वभावाने अनेक पिढ्या घडवणाऱ्या श्री. स. म. वडके विद्यालय, चोंढी-किहीम येथील निवृत्त शिक्षिका वैशाली भिडे यांचा अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत आयोजित केला होता. हा सोहळा रविवार, ५ ऑक्टोबर रोजी सातिर्जे येथील शिरधनकर परिवाराच्या माऊली व्हिलेज रिसॉर्टमध्ये सायंकाळी ५ वाजता आठवणींच्या कल्लोळात रंगला. या सोहळ्यास किहीमचे सरपंच प्रसाद (पिट्या) गायकवाड, श्रीधर घरत, रमेश पाटील, वेलणकर, रमेश म्हात्रे, उदय राऊत, प्रसाद घासे, सुहास लाड, गायकवाड, दिलेंद्र शिरधनकर, आतिष म्हात्रे, अनुपमा चवरकर, धसाडे, सीमा खवळे, संतोष राऊत, सुमीत पाटील-निकिता पाटील उपस्थित होते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नोकरीची संधी -** सफाई कर्मचारी (बर्गर्स आणि बूच, रांजणपाडा, अलिबाग) आमच्या टीममध्ये सामील होण्यासाठी आम्ही एक मेहनती आणि प्रामाणिक व्यक्ती शोधत आहोत. तपशील: पगार: ₹१३,०००/ महिना+ टिप्स/सेवा (७%) राहण्याची व्यवस्था आणि जेवण साप्ताहिक सुट्टी : मंगळवार कामाचे तास : दुपारी १२ ते रात्री ११ (दररोज किमान २ तासांच्या ब्रेकसह) व्हाट्सॲपवर कॉल करा : ७५०६९५४६११/ ९९३०६३४००३
- **पाहिजेत!!! अलिबाग येथील दुकानात आणि टायर साठी** अनुभवी किंवा फ्रेश मुले हवी आहेत. कॉम्प्युटर बिलिंग साठी मुले हवी आहेत.संपर्क:८१४९४८०६८४
- **अकाऊटंट पाहिजे.** पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- **आवश्यक :** सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख ११ ऑक्टोबर २०२५, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू. किमान वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे आहे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# सेवा पंधरवड्यात रस्त्याचे प्रश्न निकाली

## विविध तक्रारींचे करण्यात आले निराकरण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात १९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा पंधरवडा साजरा करण्यात आला. ज्याचा उद्देश शासनाच्या विविध सेवा लोकांपर्यंत पोहोचवणे आणि महसूल प्रशासनाला अधिक कार्यक्षम बनवणे हा होता. या अभियानात स्वयंसेवी संस्था आणि प्रशासनाने मिळून लोकाभिमुख उपक्रम राबवले, तसेच जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर जोर दिला. त्यात पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, पाणंद रस्त्यांची नोंद, शेतावर जाण्यासाठी रस्ते



उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्र घेणे.

रस्ता अदालत आयोजित करून शेतरस्त्यांचे प्रलचित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे ही कार्यवाही करायची होती.

त्या अनुशंघाने कर्जत तालुक्यात सेवा पंधरवडामध्ये भूमिअभिलेख विभागाकडून अनेक प्रलंबित दावे निकाली काढण्यात या विभागाला यश आले आहे. तर सात गावांचे पांधन रस्ते हे पूर्ववत करण्याचे काम याकाळात यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. तर वैयक्तिक दावे देखील निकाली निघ-ाले असून वनपट्टे, फेरफार अर्ज, नक्कल अर्ज,तक्रारी यांचा निपटारा करण्यात हा विभाग यशस्वी झाला आहे.

तालुक्याचे भूमी अभिलेख विभागाचे उप अधीक्षक नितीन आटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत तालुक्यात सेवा पंधरवडा सप्ताह साजरा करण्यात आला.

या काळात कर्जत तालुक्यात अनेक वर्षे प्रलंबित असलेले दावे तक्रारी निकाली काढण्याचा पर्यटनया विभागाच्या माध्यमातून करण्यात आला. फेरफार अद-ालत घेऊन शेतकरी खातेदार यांचे अनेक प्रलंबित फेरफारांना मंजुरी देण्यात आली. मृत वर्षांच्या वारसाचा शोध घेऊन नगर भूमापक यांच्या माध्यमातून सोडवण्यात यश आले. शेतकरी आणि खातेदार यांचे प्रलंबित दावे यांच्यावर कर्जत येथील कार्यालयात अदालत घेण्यात आली. त्यावेळी एकत्रिकरण तक्रारींचा निपटारा, नक्कल अर्ज, फेरफार अर्ज, वनपट्टे मोजणीच्या नकलांचे वाटप आणि विविध तक्रारींचे निराकरण करण्यात आले.

मात्र त्याचवेळी अनेक गावांना भेडसावणाऱ्या पांधन रस्त्यांचा प्रश्न गावोगावी भेटी देऊन सोडवण्याचा प्रयत्न या कालावधीत करण्यात आला. त्यात सात गावांमधील पांधन पाणवठ्याकडे जाणारे रस्ते हे पूर्ववत करण्यात गावभेटीत यश आले.

त्यासाठी उप अधीक्षक नितीन आटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली भूमापक अपेक्षा भोईर, शैलेश जाधव, संजय गायकवाड, रामचंद्र कवठे, निलेश हराळ, किरण जावरे, यांनी सनद वाटप कार्यक्रम गावोगावी जाऊन यशस्वी केला.

**पाणंद रस्ते खुले**

**चिंचवली, चेवणे, आनंदवाडी, हूमगाव, डोणे, कोंदिवडे, जामरुंग या गावातील पाणवठ्याकडे जाणारे रस्ते खुले करून त्यांची सनद वाटप करण्यात आली. तर तालुक्यातील सहा गावातील झुगरेवाडी, वावळोली, कशेळे, चाफेवाडी, बोरिवली आणि वडवली या गावातील प्रलंबित दवे देखील सेवा पंधरवडा येथे निकाली काढून सनद वाटप करण्यात आली.**

# पी. एन. पी महाविद्यालयात जयंती साजरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून दि ३ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील माजी विद्यार्थी वेदांत कंटक हे उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व मान्यवरांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. त्यानंतर महाविद्यालयातील पंकज पांडुळे आणि ध्रु राऊत या विध्यार्थ्यांनी विविध स्पर्धामध्ये भाग घेऊन पारितोषक मिळवल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्यासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे वेदांत कंटक यांनी आपल्या मार्गदर्शनामधून महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन चरित्रावर अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. त्यानंतर महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे यांनी आपल्या संवादामधून विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीजींच्या अहिंसेच्या विचाराने पावले टाकावीत असे विशेष नमूद केले. आपल्या अध्यक्षीय वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमकार पोटे यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे कार्य आणि योगदान यावर भाष्य केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रा. साईनाथ पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद घाडगे, प्रा. पूजा पाटील तसेच महाविद्यालयातील इतिहास विभागाचे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिलिंद घाडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. साईनाथ पाटील यांनी केले.



## तळवलीत शिक्षकांचा सन्मान

**। खांब । प्रतिनिधी ।**

तळवलीतर्फे अष्टमी येथील प्राथमिक शिक्षकांचा सन्मानाचा कार्यक्रम उत्साहात करण्यात आला. लिना खराडे व सोनाली भोसले यांची शासकिय नियमानुसार दुसऱ्या शाळेत बदली झाली असल्याने व सेवावृत्त शिक्षिका वैशाली मरवडे तसेच तळवली येथे नव्याने रूजू झालेले रविंद्र लाडगे यांचे तसेच स्वागत व सन्मानाच्या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी वैशाली मरवडे, लिना खराडे, सोनाली भोसले व रविंद्र लाडगे यांचा सन्मान करण्यात आला.



## माथेरानमध्ये वाल्मिकी जयंती साजरी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान नगरपरिषदेच्या कार्यालयात येथील वाल्मीक बांधवांनी रामायणाचे रचनाकार महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी केली. यानिमित्त संत वाल्मीकी, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सुरेंद्र ठाकूर, सदानंद इंगळे, ज्ञानेश्वर सदगीर, भारत पाटील, स्नेहा साखलकर, शिवाजी शिंदे, कुलदीप जाधव, प्रदीप घावरे, संतोष लखन, रामचंद्र चव्हाण, विनोद सोळंकी, पापा पुरबिया,नरेश पुरबिया, शैलेश चव्हाण, नीता चव्हाण, लोटनकर उपस्थित होते.

## महाडमध्ये अनेक इच्छूकांचा हिरमोड

महाड : गेल्या चार वर्षापेक्षा जास्त काळापासून प्रतीक्षेत असलेल्या नगरपरिषदांच्या निवडणुका संदर्भात न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानंतर मुंबईत झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये महाड नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली आहे. या घोषणेने इच्छुक असलेल्या अनेक उमेदवारांचा प्रचंड हिरमोड झाल्याचे दिसून आले. मुंबईमध्ये झालेल्या या संदर्भातील सोडतीमध्ये महाड नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाल्याचे दिसून आले.

## वासांबे-मोहोपाडा येथे स्वच्छता रॅली

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

सामाजिक संदेश देत स्तुत्य उपक्रमातुन विविध लोकपयोगी कार्यक्रम राबविणाऱ्या खालापूर तालुका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या माध्यमातून सणासुदीच्या पार्श्वभूमीवर वासांबे ग्रुप ग्रामपंचायत आणि जनशिक्षण संस्थान (जे.एस.एस) अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार (दि.६) ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत कार्यालय ते शिवाजी चौक, तसेच मुख्य बाजारपेठमधून मोहोपाडा पोलीस चौकी अशी स्वच्छता रॅली काढण्यात आली.

या रॅलीत पत्रकार, शालेय विद्यार्थी, ग्रामपंचायत कर्मचारी सहभागी झाले होते.



यावेळी सामजिक संदेश देणारे बॅनर हातात घेत जनजागृती घोषणा देण्यात आल्या. यावेळी सामूहिक स्वच्छता शपथ घेण्यात आली. तसेच पर्यावरण महत्त्व सांगत कापडी पिशव्यांचे वाटप हि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उमा मुंढे, कल्पना म्हात्रे, वर्षा रामटेके जनशिक्षण संस्थान अलिबाग रायगड अनेक ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक, राकेश खराडे, अर्जुन कदम, राहुल जाधव, अमोल सांगळे, गौतम सोनावणे, प्रतीक चाळके, बाळाराम केदारी, शाबीर शेख, देवा पवार, पंढरीनाथ कुंरंगळे यांच्यासह खालापूर तालुक्यातील पत्रकार बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत कार्यक्रम दिमाखदार पध्दतीने यशस्वी केला.

# डॉ. घरटकर फाऊंडेशनतर्फे प्रशिक्षण

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

भविष्य आपल्या हातात नसलं तरी त्याला मनासारखा आकार देण्यासाठी आपण दिशा देऊ शकतो विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना १० वी १२ वी नंतरच्या प्रगतीच्या हजार वाटा चोखाळता याव्यात या हेतुने व्यवसाय मार्गदर्शन शिबीरांच्या माध्यमातुन डॉ. सनाउल्लाह घरटकर फाऊंडेशन कार्यरत आहेत.



मुरुड तालुक्यातील अंजुमन इस्लाम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, मेहबूब एज्युकेशन ट्रस्ट ज्युनिअर कॉलेज, विहूर व नचिकेताच हायस्कूल मुरुडच्या इयत्ता १० वी व १२ वीच्या सुमारे ३५० विद्यार्थ्यांना तीन दिवसीय व्यावसायिक मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीर आयोजित करून प्रगतीचा मार्ग खुला केला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी राशीद फहीम, कार्यकारी सदस्य शाहीद कलाब, नौशाद शाबान, तौसिफ फत्ते, इमरान मलिक, समीर दौनाक, सीमा दामाद, प्राचार्य वसिम सातारेकर, सीमा रणदिवे, प्रियांका दांडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## कीर्तीनिधी ठाकूर यांना मातृशोक

**चिरनेर :** दिघोडे येथील कुसुम हसुराम ठाकूर (८३) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर दिघोडे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच कीर्तीनिधी ठाकूर यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात दोन पुत्र व एक विवाहित कन्या सुना व नातवंडे असा त्यांचा परिवार आहे.





## भक्त निवास बांधकामाचे भुमीपूजन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

श्री वरदविनायक गणपती बाप्पा मंदिर परिसरात धनाचा दैवत असलेले कुबेर यांचे मंदीर आणि भक्त निवासाच्या भव्य इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन खालापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा रोशना मोडवे आणि मान्यवर ग्रामस्थांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले.

याप्रसंगी सुनिता पाटील, मिनल कबले, मनिष मोरे, शिंदे, मोहिनी वैद्य, सिद्धार्थ जोशी, मंगेशकुमार थत्ते, चंद्रशेखर टिळक, किरण काशिकर, ॲड. विवेक पेठे उपस्थित होते.

**वसंतराव नाईक महाविद्यालयाचा सुप्त उपक्रम | जंगल भ्रमंती दरम्यान निसर्ग निरीक्षण**

# वन्यजीव सप्ताहानिमित्त शैक्षणिक क्षेत्रभेट

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

वन्यजीव सप्ताहानिमित्त कोकण उन्नती मित्रमंडळाचे, वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, बॅरिस्टर ए. आर. अंतुले शैक्षणिक संकुल, मुरुड-जंजिरा व फणसाड वन्यजीव अभयारण्य यांच्या संयुक्त विद्यमाने फणसाड वन्यजीव अभयारण्यात विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. या क्षेत्रभेटीत एकूण ६७ विद्यार्थी व ११ प्राध्यापक यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यभर वन्यजीव सप्ताहाचे विविध उपक्रम राबवले जात असून, फणसाड वन्यजीव अभयारण्यातही या



निमित्ताने अनेक जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग घेऊन वन्यजीव संरक्षणाबाबत ज्ञान वाढविले. जंगलात भ्रमंती दरम्यान विद्यार्थ्यांना वनस्पती, झाडे, फुलपाखरे, पक्षी, कीटक, सरीसृप, बुरशी इत्यादी जैवविविधतेच्या घटकांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निरीक्षणातून निसर्गाचा समृद्ध वारसा अनुभवला. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी वन्यजीवांवरील माहितीपूर्ण पीपीटी सादरीकरण आणि शैक्षणिक चित्रफितीचे प्रदर्शन करण्यात आले. यातून वनसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन या विषयांवर विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती फणसाड वनविभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी- नितीन ढगे आणि कर्मचारी यांनी केले. त्यात प्रदीप बागवे, सदानंद नाईक, आदेश पोकळ, भामरे आणि आरोटे या वनकर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच ग्रीन वर्क्स ट्रस्टचे आकाश म्हैसधुणे, शिवानी पुजारी आणि प्रा. प्रणव बागवे यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग निरीक्षण व वन्यजीव अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन फणसाड वन्यजीव अभयारण्य, वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय आणि ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या उपक्रमासाठी प्राचार्य जनार्दन कांबळे, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, डॉ.गजानन मुनेश्वर, डॉ. नारायण बागुल, डॉ. सीमा नाहीद, प्रा. प्रणव बागवे, प्रा. सिद्धेश सतविडकर, प्रा. चिंतन पोतदार, प्रा. मुस्कान रज्जब, प्रा. रुफी हसवारे आणि प्रा. प्रवेश पाटील उपस्थित होते.

> "विद्यार्थ्यांनी या क्षेत्रभेटीतून निसर्गसंवर्धनाबाबत मौल्यवान ज्ञान आणि प्रेरणा मिळविली. वन्यजीव सप्ताहानिमित्त झालेली ही क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि पर्यावरणाभिमुख अनुभव ठरली."
> – डॉ.जनार्दन कांबळे

# मोहोपाड्यात पाण्याची लाईन फुटली

**रसायनी :** दांड रसायनी रस्त्यावर महानगर गॅस पाईपलाईन टाकण्यात आली आहे. या रस्त्यावर गॅस पाईपलाईनचे वर्षभरात दोन ते तीन महिन्याआड खोदकाम होत असल्याने रस्त्याला खड्डे पडून रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. त्यातच महानगर गॅस पाईपलाईनचे काम होत असताना मोहोपाडा प्रवेशद्वारासमोर पिण्याच्या पाण्याची पाईपलाइन फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया जात आहे. या फुटलेल्या पाण्याची लाईन एमआयडीसी जिवन प्राधिकरणाने दोन दिवसांत दुरूस्त न केल्यास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे कुरूंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिनीच्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. किशोर दशरथ शेलार, श्री. प्रसाद गोपिनाथ परब व श्री. संपत राजाराम देशमुख उर्फ संपत अनंत देशमुख यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कुरूंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकती**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १७ | ३/अ | ०.४२.०० | ०.२५ |
| | | पो.ख. ०.११.०० | |
| | | एकूण ०.५३.०० | |
| १७ | ३/क | १.१९.०० | ०.७० |
| | | पो.ख. ०.२७.०० | |
| | | एकूण १.४६.०० | |

सदर मिळकती व त्यातील तदंगभूत सर्व हक्कहितसंबंध सुद्धा कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकित दान, साठेकरार, बयाणा पावती, खरेदीखत, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजाविरहीत असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिली आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता : 'श्री सद्‌गुरू कृपा', १४८४,
शेलू रेल्वे स्टेशनजवळ, मु.पो. शेलू,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
खरेदीदारतर्फे ॲडव्होकेट
मो. ९८६०६२६२४६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. धोत्रे, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. गणेश विठ्ठल क्षीरसागर व श्री. विठ्ठल शामराव क्षीरसागर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| १५ | ४ | ०-७९-०० | ०-५० |

वरील जमिन मिळकती मध्ये जमिन मालक यांचे मालकीचे विकत देत असलेले
क्षेत्र ०-३८-५४ हे. आर. पॉ

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/१०/२०२५

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत तिचे मालक १) श्री. दिनेश मोरेश्वर लोभी २) श्री. संदीप बाळु पाटील ३) श्री. सुभाष बाळु पाटील ४) श्री. जगदीश काशिनाथ पालकर यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| ९६ | ४ | ह | २.८०.२५ | ५=६० |

वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फर१क्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/१०/२०२५

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४/९२७१८६९२०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे कळंब, ता.कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत श्री. गमन हरिचंद्र आगिवले यांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| तनविर बशीर बुबेरे | १०६/३ | ०.५७.०० | ०.४४ |

**वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक-तनविर बशीर बुबेरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल व सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : ०७/१०/२०२५ सही/-

**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता-शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत श्री. धिरेन मनसुखलाल संघवी व इतर यांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्रीम. ताराबाई गोपाळ बोराडे व इतर ४ | ५/६ | ०.३४.४० | ५.१९ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा- कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक-श्रीम. ताराबाई गोपाळ बोराडे व इतर ४ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल व सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : ०७/१०/२०२५ सही/-

**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता-शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस,
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, मौजे तिवरे, ता कर्जत, जि रायगड येथील जमीन मिळकतीचे मालक १) श्री काशिनाथ दत्तू भोईर २) श्री भाग्यवान दत्तू भोईर यांचेकडून आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत, विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|
| २७/३ | ०.२९.३० | ५.२५ |

सबब सदरील मिळकतीबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास, सदरची मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून, वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक - ०८/१०/२०२५

**ॲड. रूपेश एकनाथ पाटील**
कार्यालय - शिव ओम कॉम्पलेक्स,
गाळा नं १०, मुदे बुद्रुक,
ता. कर्जत, जि रायगड
मो - ९०९६०६०४०४

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. किरण सीताराम भोईर, रा. देसाई तेलेपाडा, कल्याण शिळफाटा रोड, पो. पडले, कल्याण, ठाणे, ४२१२०४, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन विकसन कराराने विकसनासाठी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे नसरापुर, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र | आकार (रू. पै .) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १/३/ब | ०.८४.०० | १.०० | श्री. रमेशसिंह हरिसिंह ठाकुर |
| | पो.ख.०.०५.०० | | |
| | एकुण ०.८९.०० हे.आर.पॉ. | | |
| १/५ | २४६.००.०० चौ.मी. यापैकी विकसनासाठी दिलेले क्षेत्र १.०५.०० चौ.मी. | २४६०.०० | श्री. रमेशसिंह हरिसिंह ठाकुर व सौ. रेखा रमेश सिंह. |

वरील वर्णनाच्या जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा, विकसन कराराचा वा कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत सही/-
दिनांक :- ०८/१०/२०२५.

**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल जि.रायगड

कार्यालय- आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल- ४१०२०६
दुरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/मातंवि/३०२५/प्र.क्र.०९/३६५/२०२५ दिनांक : ०७/१०/२०२५

**जाहिर सुचना बाजारभावाकरिता**

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा/पमपा/मातंवि/३०२५ /प्र.क्र.०९/३६५/२०२५-२६ | नागरी सुविधांचे नेटवर्कचे मॅपींग (१,४०००) व ॲट्रीब्युट्स तयार करुन GISडेटा तयार करणेबाबत.(Water Supply, Strom Water, Drain, Road Network & Administrative Boundaries दि. ०८/१०/२०२५ ते दि. १७/१०/२०२५ |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ०८/१०/२०२५ ते दि. १७/१०/२०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल गजेंद्र यशवंत प्रभू व राजेश रमेश चिंकाटे, रा. मुंबई यांनी करूणा सूर्यकांत पिसाट, संगीता सूर्यकांत पिसाट, रा. मौजे रोहिनीकोंड, ता. म्हसळा, जि. रायगड यांच्याकडून खाली वर्णन केलेली जमिनीची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे रोहिनीकोंड, ता. म्हसळा, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | खाते क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३७ | ७१ | ०.८७.२० | ०.६१ |

वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ०६/१०/२०२५ सही/-
ठिकाण : मुंबई

खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. जुईली अनिल मुकादम**
(बी.एल.एस.एल.एल.बी.)
पत्ता : ओम चिंतामणी सोसायटी
काकासाहेब गाडगीळ मार्ग, खेडगल्ली
प्रभादेवी, मुंबई- ४०००२५

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. ४६५/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगांव यांचे न्यायालयात**

कु. निलिमा मारुती भुवड
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी, अर्जदार
रा. अंबर्ले, ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत अंबर्ले, सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार कु. निलिमा मारुती भुवड हिचा जन्म मौजे अंबर्ले, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १५/०४/१९८९ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १५/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे अंबर्ले, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १५/०४/१९८९ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार कु. निलिमा मारुती भुवड हिचा जन्म मौजे अंबर्ले, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १५/०४/१९८९ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. २५/०९/२०२५ **सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.४९५/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. रिदवाना शेख अहमद बंदरकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. रिदवाना अलखाक बडे
लग्नानंतरचे नाव
वय ५१ वर्षे, धंदा : गृहिणी, अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. रिदवाना शेख अहमद बंदरकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रिदवान अखलाक बडे - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे उपजिल्हा रूग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १९/०८/१९७४ रोजी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना क्र. मानपं/जन्म-मृत्यू/३४६/२०२३-२४ ने दि. १२/०६/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे उपजिल्हा रूग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १९/०८/१९७४ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. रिदवाना शेख अहमद बंदरकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रिदवाना अखलाक बडे - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगाव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १९/०८/१९७४ रोजी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव **सही/-**
ता. २९/०९/२०२५ **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. २२४/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी साो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. नासिरा युनुस जलगांवकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. नासिरा इरफान बंदरकर
लग्नानंतरचे नाव
वय ५८ वर्षे, धंदा : गृहिणी, अर्जदार
रा. साई,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत साई,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव, सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. नासिरा युनुस जलगांवकर-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. नासिरा इरफान बंदरकर - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे साई, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/०२/१९६७ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०६/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे साई, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/०२/१९६७ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. नासिरा युनुस जलगांवकर-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. नासिरा इरफान बंदरकर-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे साई, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०९/०२/१९६७ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव सही/-
ता. १५/०९/२०२५ कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहिर सूचना
### रायगड जिल्ह्यातील ताडी दुकानांचा ई-लिलाव सन २०२५-२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, रायगड जिल्ह्यातील ८७ ताडी दुकानांचा जाहिर लिलाव (ई-लिलाव-नि-निविदा) पद्धतीने दि.३१.१०.२०२५ रोजी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर घेण्यात येणार आहे. संबंधितांना कळविण्यात येते की, सदर ई लिलावाच्या अटी व शर्ती तसेच प्रक्रियेबाबत अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग व सर्व विभागीय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. सदरील ई लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

दिनांक ०६.१०.२०२५ **सही/-**
**जिल्हाधिकारी, रायगड**

## अरूणा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, अलिबाग

आर-३९, श्रीबाग नंबर ३, सेंट्रल बँक समोर, अलिबाग-रायगड
रजि.नं.आरजीडी/एबीजी/एचएसडी/टीसी/३५१/९७/ता.२७.०५.१९९६ संपर्क ८८५६०७३५९१(मा.अध्यक्ष)

**जाहीर नोटीस**

मे अरूणा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अलिबाग यांचेकडून या जाहीर नोटीशीने सर्वांस कळवण्यात येते की, अरूणा सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित अलिबाग ही एक नोंदणीकृत सहकारी संस्था असून तिचा नोंदणी क्रमांक आरजीडी/एबीजी/एचएसडी/टीसी/३५१/९७/ता.२७.०५.१९९६ असा आहे. उपरोक्त संस्थेच्या मालकीची व ताबेकब्जातील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

अलिबाग नगरपालिका हद्दीतील श्रीबाग क्र.३ येथील सर्वे नं.१०३/१/अ/३९ क्षेत्र ५४०.०० चौमी सदर बिनशेती भूखंडावर सध्या अरूणा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अलिबाग ही इमारत अस्तित्वात आहे. सदर इमारत आत जुनी व जीर्ण झाली असल्याने तिचा पुनर्विकास करणे क्रमप्राप्त झाले आहे.

उपरोक्त पुनर्विकास कामी अनुभवी वास्तु विशारद/प्रकल्प सल्लागार यांचेकडून फिजिबीलीटी रिपोर्ट तयार करून संस्थेस देण्यासाठी अनुभवी वास्तु विशारद/प्रकल्प सल्लागार संस्था देकार मागवित आहे. संस्थेसंबंधीत सर्व कागदपत्रे व इतर माहिती मा.सचिव अरूणा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अलिबाग यांचेकडे कार्यालयीन वेळेत बघण्यासाठी उपलब्ध असतील. कोणताही देकार स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क अरूणा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अलिबाग यांचेकडे राहील.

संपर्क : सचिव ९८८१७१६४५३

सही/-
**सचिव**
**अरूणा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस कळविण्यात येते की सर्वे नंबर ११/३,११/४ मौजे लाडीवली हद्दीतील जमिनीबाबत पनवेल येथील उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात या सर्वे नंबर बाबत केस प्रलंबित आहे या जमिनी बाबत कोणीही त्रयस्थ व्यक्तीने व्यवहार खरेदी विक्री लीज असे कोणत्या प्रकारचे दस्तऐवज करू नये नुकसान झाल्यास ते स्वतः जबाबदार असतील याची नोंद घ्यावी.

**श्री जयवंत शालिक पाटील**
मु.लाडिवली, पो.गुळसुंदे,
ता.पनवेल, जिल्हा.रायगड
मोबाईल नंबर ९९८७५९७२३४

## उरण नगरपरिषद, उरण जिल्हा रायगड
### जाहीर सूचना

ज्या अर्थी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११ अन्वये उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादी तयार करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांनी मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेशान्वये व ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार संघाच्या यादीवरुन उरण नगरपरिषदेच्या प्रभाग क्र.१ ते १० या प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या छापून घेऊन मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांनी तयार केलेल्या आहेत. त्या याद्या संबंधित मतदारांचे माहितीसाठी दिनांक ०८/१०/२०२५ रोजी प्रसिद्ध करणेत येऊन नागरिकांच्या माहितीसाठी पुढील ठिकाणी उपलब्ध करण्यांत आलेल्या आहेत.

१) जिल्हाधिकारी रायगड यांचे संकेत स्थळावर २) उरण नगरपरिषद कार्यालय नोटीस बोर्ड ३) तहसिल कार्यालय उरण जि.रायगड नोटीस बोर्ड ४) उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.३ मोरा-उरण नोटीस बोर्ड येथे तसेच उरण नगरपरिषदेच्या https://mahaulb.in/PortalSite/#/app/home या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

त्याअर्थी सदरची मतदार यादी तयार करताना काही चुका राहिलेल्या असल्यास त्या दुरुस्त करण्या संदर्भात दिनांक ०८/१०/२०२५ ते दिनांक २३/१०/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संबंधितांकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहेत. यासंदर्भात पुढील बाबी विचारांत घेतल्या जातील.
१) काही लेखनिकांच्या, टंकलिपीकांच्या किंवा संगणकीय मुद्रण दोष असल्यास,
२) एका प्रभागांतील नावे चुकून दुसऱ्या प्रभागामध्ये अंतर्भूत झाली असतील तर,
३) नगरपरिषदेच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रांतील नांवे दिनांक ०१ जुलै २०१५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीत असूनही नगरपरिषदेच्या मतदार यादीमध्ये वगळली गेली असल्यास,
सबब,नागरीकांच्या वरील बाबत काही सूचना अगर हरकत असल्यास त्यांनी उक्त नमूद केल्याप्रमाणे विहीत मुदतीमध्ये सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या सूचना वा हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

उरण नगरपरिषद कार्यालय सही/-
उरण, दिनांक ०८/१०/२०२५ **(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रवीण प्रभाकर पडते, यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग | २०७६ | जिरायत ००-०८-२० | ०१.९६ |
| | | पो.ख.००-००-१० | |
| | | एकूण ००-०८-३० | |

वर नमूद मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर मिळकती मधून इतर मिळकतीत जाणे करीता कोणतीही पायवाट अथवा वहिवाटीचा मार्ग, पाणी जाणेचे परंपरागत मार्ग अस्तित्वात नाही. सदर मिळकत गुर चरण पद्धतीची नाही, या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा ) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १५/१०/२०२५

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा.क्र.९९२२७९८५२८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# योग – आनंदी जीवनाचा राजमार्ग



**विजयानंद प्र. शेंबेकर**
**अलिबाग.**

आजचे युग हे जेट युग आहे असे आपण मानतो. याचे मुख्य वैशिष्ट म्हणजे वेग, त्यासाठी यांत्रीकिकरण व अमर्याद स्पर्धा, आपल्या अस्तित्वाची लढाई. याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे जीवनात अतिरिक्त ताण, अनिश्चितता व विविध आघाडीवर कुतरओढ अशा या जीवनशैलीमुले आज वृद्धत्व लवकर येत आहे.

अर्थात जे आजार वयाच्या ५०-६० दरम्यान येत होते ते आज चाळीशीतच येत आहेत. आज सर्वसामान्य माणसाचे आर्थिक जीवनमान उत्तम आहे व बहुतांश लोकांकडे भौतिक सुखसाधने सहज उपलब्ध झाली आहेत किंबहुना त्याचा अतिरेक असून सुखासीनता वाढली आहे. मात्र ज्यासाठी सर्व धडपड चालली आहे ते आरोग्य, शांती समाधान हरवले आहे.

पाश्चिमात्य जग बाह्य विकासाला महत्त्व देते मात्र पौर्वात्य (आपले) ऋषी अंतर्विकास महत्वााचा मानत. एखादे झाडवरून खूप वाढले मात्र, त्याची मुळे जमिनीत खोलवर व दूरवर पसरली नाहीत तर त्याचा डोलारा फारकाल तग धरु शकणार नाही तद्वत मानवी जीवनात अंतर्विकास साधणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

अंतर्विकासाचा मार्ग म्हणजे योग. योग म्हणजे संतुलन, समत्व, स्थिरता, स्वतःला जाणण्याचा मार्ग. सभोवताली असलेल्या विश्वाशी जुळवून घेऊन ''सर्वेपिसुखिन: सन्तु'' अशी जीवनशैली. म्हणूनच व्यवहारात हा योग कसा अंगीकारायाचा ते सांगण्याचा हा प्रयत.

स्वास्थ्याचा विचार करता योगाच्या दृष्टीने ''पंचकोषशुद्धी''होणे आवश्यक आहे. आपले शरिर हे पंचकोषांचे बनले आहे दृश्य शरीर जे रक्त, अस्थीमांसमज्जाया पासून बनले आहे ते मुख्यतःअन्नावर वाढते म्हणून त्याला ''अन्नमयकोष'' म्हणतात. त्याचे कार्य करण्यासाठी जी उर्जा (Energy) लगते ती म्हणजे प्राण. ७२०० नाड्या (प्रवाह) असलेला हा कोष म्हणजे ''प्राणमयकोष''. या दोन कोषाना कार्य करण्याची प्रेरणा देणारी शक्ती म्हणजे मन किंवा ''मनोमयकोष'' मनोमयकोषाचे नियमन/नियत्रण ठेवणारी शक्ती म्हणजे ''विज्ञानमयकोष'' वसर्वात आत ''आनंदमयकोष'' म्हणजे सत्-चीत्-आनंद. म्हणजे स्वभावत: आपल्या आत आनंद आहे पण आपण आनंदी नाही. याचे कारण आनंदावर असलेले वरील कोष अशुद्ध असणे.

बाह्यशरीर हे योग्य आहार, योग्य विहार म्हणजे आपली दैनंदिन दिनचर्या (Routine) ज्यात व्यायाम अत्यंत आवश्यक आहे व पुरेशी विश्रांती या त्रिसूत्रीने चांगले राहते. या तिन्ही आघाडीवर आपण अनैसर्गिक राहतो. या तिन्ही बाबत योग्य काय ते आपण सर्वजण जाणतो (काय करावे काय करू नये) मात्र व्यवहारात जाणीव पूर्वक ते आणले तर हा कोष शुद्ध राहतो.

शरीर हे जड (Matter) असते व इतर कोष हे उर्जा (Energy) आहेत. आपल्याला होणाऱ्या आजारांपैकी हे शारीरिक
त र



७५
ट क के

हे आतील कोषांमधील अशुद्धततून होतात. जीवनात येणारी कोणताही ताण, भावभावना किंवा काम क्रोधादिषड्रिपू शरीरात काही स्त्राव निर्माण करतात किंवा रासायनिक प्रक्रिया घडवून आणतात (For evry emotion there is secretion) अश्या या रासायनिक द्रव्यांमुळे आपल्या शरीरात काही काळ अशुद्धता निर्माण होते. ती भावना/ताण गेल्यावर काही काळाने शरीर ती अशुद्धता बाहेर टाकते मात्र त्यासाठी विश्रांतीची/शांत झोपेची आवश्यकता असते. व्यक्ती सतत ताणाखाली असेल किंवा एखादी जीवनावर खोलवर आघात करणारी घटना/ प्रसंग घडला तर त्यामुळे स्त्रवणारी रासायने घट्ट थर तयार करतात व प्राणमयकोषातिल प्रवाहात साठून राहतात व काही ठिकाणचा प्रवाह कमी किंवा बंद करतात. ज्या अवयवाला किंवा भागाला प्राणशक्ती मिळत नाही त्याचे कार्य बिघडते व म नोकायिक (psycosomaatic) आजार निर्माण होतात. ते औषधे घेऊन ही बरे होतनाहीत आधुनिक वैद्यकात यावर उपाय नाही. मात्र योगात यावर प्राणायाम वध्यान (Meditation) हे उत्तम मार्ग सांगितले आहेत.

नियमित प्राणायाम केल्याने व्यक्तीचे श्वसन संथ व खोलवर होऊ लागते. रक्त शुद्ध होते. त्यामुळे सर्व अवयवांचे कार्य सुधारते. शरीराच्या शुद्धतेबरोबर व्यक्तीच्या जाणीवेचा विस्तार होऊ लागतो व व्यक्ती वैश्विक (Universal) होऊ लागते.

आता ध्यानाविषयी समजून घेऊ. त्यासाठी आधी मन म्हणजे काय ते पाहू. मन हे एक तरल माध्यमआहे ते सर्व शरीर भर पसरलेले आहे (जसे एखाद्या पाण्याच्या माठात पाणी भरलेले असते) ते बाह्यजगाकडून येणाऱ्या संवेदना ज्ञानेन्द्रीयां (डोळे, नाक, कान, त्वचा, जीभ) कडून बुद्धीकडे पाठवते. बुद्धीते काय आहे? त्याावर काय क्रिया करायची ते ठरवून मनाद्वारेच कार्मेद्रीयाना (हात, पाय, वैगेरे) कळवते व माणूस कार्य करतो. विचार म्हणजे या सर्व प्रक्रियेत मनावर उठणारे तरंग. मनावर सतत तरंग उठत असतात त्यामुळे सतत विचार येणे हा मनाचा स्थायीभाव आहे. त्यामुळे मनाला विश्रांती मिळत नाही. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे मानात येणारे विचार आपल्याला समजतात. ध्यान म्हणजे काहीही न करणे. म्हणजे मनात येणाऱ्या विचारांकडे साक्षीभावाने (त्रयस्थपणे) पाहणे. विचार आला तर तो एक तरंग आहे जसा आला तसा निघून जाईल त्यावर कोणतीही प्रतिक्रिया न देता बसून राहणे.

यासाठी प्रथम स्थिर आसनात (शक्य तो मांडी घालून किवा पद्मासन, अर्धपद्मासनात) डोळे बंद करून बसणे आवश्यक. हात ध्यान मुद्रेत ठेवावेत, बाह्यसंवेदना म्हणजे आवाज येणे, वास येणे, डोळ्यासमोर काही दिसणे यावर अलिप्तता ठेवणे. असे बसल्यावर काही काळातच विचारांची गती कमी होते व अल्पकाळ मन शांत झाल्याचा अनुभव येतो. हीच ध्यानावस्था (Meditative state) याक्षणी आपण धड जागे नसतो किवा झोपलेले नसतो मात्र आतून सावध व अलिप्त (Awared detaached ) असतो. नियमित आभ्यास/सराव केल्यास हे जमू लागते. ( युट्युब वरील spiritual Reality हा व्हिडीओ आवश्य पहा )

सुरुवातीच्या काळात मनाला गुंत वण्यासाठी काही आलंबन द्यावे लागते जसे श्वासावर लक्ष केंद्रित करणे, ज्योतीवर नजर स्थिर ठेवणे (नाटक), एखाद्या आवाजावर लक्ष केंद्रित करणे वैगेरे. मात्र हळूहळू सरावाने ह्या बाह्यसाधनांची गरज राहत नाही.

ध्यान म्हणजे मनाची आंघोळ. गढूळपाणी जसे शांत ठेवले की शुद्ध होते तसे शांत बसल्याने शरीराला व मनाला खोलवर विश्रांती मिळते. मनशुद्ध व प्रसन्न राहते. हळूहळू मनाच्या शक्ती जगृत होतात. एकाग्रता वाढते, आकलन शक्ती विकसित होते. आपल्या मुळ स्वरूपाकडे प्रवास सुरु होतो अर्थात आध्यात्मिक उन्नती होते.

मनाच्या या ध्यानावस्थेत प्राणशक्तीचा जोरदार प्रवाह शरीरात प्रवाहित होतोज्याद्वारे प्राण शक्तीच्या ७२००० नाड्या शुद्ध होतात व व्यक्तीचे मनोकायिक आजार (psycosomatic deseases) बरे होतात. मनावर नियंत्रण ठेवणारा चवथा कोष म्हणजे बुद्धी किंवा विज्ञान मयकोष प्राणायाम, मेडीटेशनयाद्वारे मिळणारी उर्जा योग्य दिशेने वापरण्यासाठी (Channalizing energy) हा कोष शुद्ध ठेवणे आवश्यक असते. त्यासाठी जीवनाला उन्नत करेल असे वाचन करणे, एखादे प्रवचन ऐकणे, चांगला व्हीडीओ पाहण वैगेरे करणे, अर्थात नित्य सत्संग करणे आवश्यक अशा रीतीनेवरील सर्व कोष शुद्ध ठेवल्यास कायम शांत, समाधानी आरोग्य संपन्न जीवन सहज शक्य होते हा माझा गेल्या २२ वर्षाच्या योगशिक्षक म्हणून कार्य केल्याचा अनुभव आहे. प्राणायाम व मेडीटेशन एखाद्या योग शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली शिकून घ्या.योग्य आहार, व्यायाम, प्राणायाम, ध्यान व सत्संग हि पंचसूत्री वापरून आरोग्य संपन्न व्हा. भावी सुंदर जीवनासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

# सर्वसामान्यांचे हाल खपवून घेणार नाही

## चित्रलेखा पाटील यांचा प्रशासनाला सज्जड दम

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**अलिबाग-पेण, अलिबाग-रोहा, अलिबाग-मुरूड या रस्त्यांवर मोठंमोठे खड्डे पडले आहेत. खड्डे चुकविताना अपघात होत आहेत.नागरिकांना या खड्ड्यांचा खुप त्रास होत आहे. याबाबत वारंवार प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. मात्र, त्यांच्याकडून ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे आज जनतेच्या हितासाठी शेकाप स्टाईलने आंदोलन करण्यात आले आहे. जोपर्यंत संबंधित विभागाचे अधिकारी लेखी आश्वासन देत नाहीत, दिवाळीपूर्वी रस्ते चांगले करीत नाहीत, तोपर्यंत हा लढा असाच चालू राहणार आहे. सत्ताधाऱ्यांसह अधिकाऱ्यांनी जिवाशी खेळ चालविला आहे. त्यामुळे सर्वमान्यांचे हाल खपवून घेणार नाही, असा सज्जड दम शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे.**



● (छायाचित्र : समीर मालोदे)





शेकापच्यावतीने अलिबाग-पेण मार्गावरील पेझारी चेकनाका येथे मंगळवारी (दि.७) रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या वेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या.

यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सर्वसामान्यांना केंद्रबिंदू ठेवून शेकापने काम केले आहे. स्व. नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील तसेच माजी राज्यमंत्री शेकापच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील यांच्या नेतृत्वाखाली याच भूमीत अनेक यशस्वी लढे झाले आहेत.आजही सर्वसामान्यांच्या हितासाठी शेकाप नेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पेझारी चेकनाका येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. या आंदोलनात असंख्य कार्यकर्ते व नागरिक स्वयंस्फुर्तीने सहभागी झाले आहेत. हाच खरा शेकापचा विजय आहे. गणेशोत्सव, नवरात्रौत्सव खड्ड्यातून गेला. मात्र, दिवाळी खड्ड्यातून जाऊ देणार नाही. येत्या दहा दिवसांत खड्डे बुजविण्याचे काम पुर्ण झाले पाहिजे. दिवाळीच्या पहिल्यादिवसाच्याअगोदरचरस्त्यांवरील खड्डे सुस्थितीत भरून गेले पाहिजेत. आजपासून २४ तासांच्या आत ८ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली ०पाहिजे. अन्यथा पहिली दिवाळी याच रस्त्यावर हातात पणत्या घेऊन साजरी केली जाईल, अशा इशारा चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे.

## लढ्याची दखल घ्यावीच लागणार -ॲड. गौतम पाटील



शेकाप नेते जयंत पाटील यांनी प्रयत्न करून रस्त्यासाठी निधी मंजूर करून आणला. मात्र, सत्ताधाऱ्यांनी तो निधी वितरीत न करता, तसाच ठेवला. २०१९ पासून दमदार कामगिरी जगजाहीर आहे. निधी आणल्याचा दिखावा सत्ताधाऱ्यांनी जाहिरातबाजी करून केला. परंतु, रस्त्यांची अवस्था बिकट आहे. हे खड्डे नसून या रस्त्याला तलावाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. खोटे आश्वासन देण्याबरोबरच सोशल मिडीयावर शो बाजी करण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले आहे. या खड्ड्यांमुळे सर्वसामान्य माणूस पिचला गेला आहे. गणेशोत्सव, नवरात्रौत्सव सणदेखील खड्ड्यातून गेले.आता दिवाळी सण आला आहे. मात्र, हा सण सर्वसामान्यांना खड्ड्यातून जाऊ देणार नाही. खड्ड्यांविरोधात शेकापने आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे हा लढा यशस्वी होणार असून त्याची दखल प्रशासनाला घ्यावी लागणार आहे.

## लवकरच समाचार घेतला जाईल- ॲड. मानसी म्हात्रे



रस्ता सपाटीकरणाच्या स्थितीत होत नाही, तोपर्यंत ही लढाई जनतेसाठी सुरूच राहणार आहे. संघर्षातून लोक विकास फक्त शेकापच करू शकतो. अनेक वेळा निवेदन देण्यात आली आहेत. मात्र, त्याची ठोस कार्यवाही झाली नाही. म्हणून आता शेकापने उग्ररुप धारण केले आहे. अलिबाग-पेण रस्त्याचा ठेका मावळमधील एका ठेकेदाराला दिला आहे. १३ कोटी रुपये खड्डे बूजविण्यात खर्च झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे नक्की कुठल्या रस्त्यांचे खड्डे बुजविले, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्याला येतील भूगोल माहिती नाही, त्या ठेकेदाराला रस्त्याचे काम दिले आहे. शेकापच्या आंदोलनाला गालबोट लावण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला आहे. परंतु, त्यांना फारसे यश आले नाही. मात्र, त्यांचाही समाचार लवकरच घेतला जाईल, असा इशारा शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिला. त्या पुढे म्हणाल्या की, पुन्हा एकदा आयुष्याच्या मशाली पेटविण्याची वेळ आली आहे. स्व.नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील, स्व. मीनाक्षी ताई पाटील यांची ही कर्मभूमी आहे. या भूमीतून त्यांनी अनेक लढे, आंदोलने केले आहेत. त्यामुळे या भूमीचा एक वेगळा इतिहास आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. परंतु, सत्ताधारी व प्रशासन मुजोर झाले आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. शेतकरी कामगार पक्ष हे कदापी सहन करणार नाही. अन्न, पाणी आणि निवारा याच बरोबर वीज, पाणी व चांगल्या रस्त्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. या खड्डेमय रस्त्याला जबाबदार स्वतःला दमदार समजणारे तसेच प्रशासन व शासन आहे. सर्वसामान्यांच्या घामातून, कष्टातून मिळविलेला पैसा कराच्या रुपात शासन जमा होतो. त्याच पैशातून रस्ता व इतर सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यामुळे प्रत्येकाला आपल्या न्याय हक्कासाठी बोलण्याचा अधिकार आहे, असे ॲड. मानसी म्हात्रे यांनी सांगितले.

**जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा** | **१९० विद्यार्थ्यांना मिळाले प्रमाणपत्र**

# सेवा पंधरवड्याचा विद्यार्थ्यांना आधार

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

सेवा पंधरवडा अंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने नुकतीच विशेष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत अकरावी व बारावी विज्ञान शाखेतील १९० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. त्यामुळे या स्तुत्य उपक्रमातून विद्यार्थ्यांना पंधरवड्याचा आधार मिळाला आहे.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने जात प्रमाणपत्राची पडताळणी केली जाते. त्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र दिले जाते. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्याचे काम केले जाते. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्र वेळेवर मिळावे, यासाठी समितीच्यावतीने वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा अभियान राबविण्यात आला. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत कार्यालयात अनुसूचित जाती, वंचित दुर्बल घटकांच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय म्हणून ही कल्याणकारी योजना राबविण्यात आली.

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त मागास प्रवर्गातील विज्ञान शाखेच्या अकरावी व बारावीमध्ये शिकत असलेल्या व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी समितीकडे अर्ज करण्यात आले होते. या कालावधीत २०४ प्रकरणे कार्यालयात दाखल झाली. समितीने या प्रकरणातील कागदपत्रांची पुर्तता करून १९० जणांना जागेवर प्रमाणपत्र दिली. विशेष मोहिमेच्या माध्यमातून जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना मिळाल्याने विद्यार्थ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

### लोकाभिमुख उपक्रम

सेवा पंधरवडा अंतर्गत सर्व महाविद्यालयांना परिपत्रक काढून माहिती पत्रक पाठविणे, अर्ज प्राप्त न केलेले तसेच त्रुटी अभावी प्रमाणपत्र न मिळालेल्या विद्यार्थ्यांची तालुका व महाविद्यालयनिहाय संख्यात्मक महिती जिल्हास्तरावर जमा करणे. वेबीनारचे आयोजन करणे. विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करणे, त्रुटीयुक्त प्रकरणांची नियमानुसार, पुर्तता करून वेळेत प्राप्त प्रकरणे निकाली काढणे अशा प्रकारचे कामकाज या मोहिमेतून समितीने केले. गतिमान पारदर्शक व लोकाभिमुख उपक्रमांचे सर्वस्तरातून कौतूक करण्यात आले.

## चौल-आग्राव बनला खड्ड्यांचा मार्ग

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील चौल-आग्राव रस्त्याची ओळख आज 'खड्ड्यांचा मार्ग' अशी झाली आहे. राज्य सरकारच्या ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजुरी मिळून दहा महिने उलटले तरी कामाचा मागमूस नाही. चौलमध्ये विकासाच्या नावाखाली फक्त फलक बदलले; रस्ते मात्र तसेच राहिले, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांतून येत आहे. त्यामुळे चौल आणि आग्राव परिसरातील नागरिकांचा संयम सुटला असून सत्ताधाऱ्यांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच चौल-आग्राव रस्त्यावर खड्ड्यांसह चिखल आणि पाण्याचे साम्राज्य आहे.

## राजकीय चुरस वाढली

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदमध्ये थेट नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण झाले असल्याने जोरदार राजकीय चुरस निर्माण झाली आहे. शिवसेना शिंदे व ठाकरे गट, भाजप आणि राष्ट्रवादी या चारही पक्षांत अनेक इच्छुकांची नावे समोर आली आहेत. दरम्यान, यावेळीची माथेरान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक ही राज्यातील अन्य नगरपरिषदेपेक्षा निश्चित वेगळ्या पद्धतीने लढली जाण्याची शक्यता आहे. थेट नगराध्यक्षपद सर्वसाधारण झाल्यानंतर माथेरान पालिकेचे नगराध्यक्ष कोण होणार? याबद्दल जोरदार चर्चा रंगण्यास सुरुवात झाली आहे. शिवसेना पक्षाचे दोन पक्ष झाले असले तरी दोन्ही शिवसेनेसह राष्ट्रवादी आणि भाजपचे अनेक जण इच्छुक आहेत. माथेरान नागरी पतसंस्थेची निवडणूक ज्यांनी जिंकली त्यांना पालिकेत बहुमत मिळते, त्यामुळे यावर्षी पतसंस्थेत विजयी झालेली शिवराष्ट्र पॅनल विजयी परमार कायम ठेवणार का? याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागून राहिले आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)